म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय नाटक
दा. क्र. २०५९६
IRBK-0120596

वाचनालय
नाटक
२०५९६
२।११।८४

# त्रिकूट

राजा ठाकूर

IRBK-0120596

मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४.

पहिली आवृत्ती :
मार्च १९८४

© राजा ठाकूर

प्रकाशक :
अशोक केशव कोठावळे,
मॅजेस्टिक बुक स्टॉल,
गिरगाव नाका, मुंबई ४.

मुद्रक :
अ. के. कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५०/अ, शनवार पेठ,
पुणे ३०.

मुखपृष्ठ :
अनिल उपळेकर

मूल्य : २० रुपये

या संग्रहातील कोणत्याही एकांकिकेचा प्रयोग करण्यापूर्वी अथवा कोणत्याही प्रकारचा वापर करण्यापूर्वी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. पत्ता : राजा ठाकूर, 'दैवत', सर्वेश्वर कॉलनी, कॉलेज रोड, नाशिक ४२२ ००५.

कै. केशवराव कोठावळे
यांच्या स्मृतीस
सविनय—

स. न. वि. वि.

हे माझं तिसरं पुस्तक.
ह्या संग्रहात एकूण दोन एकांकिका व
एक दीर्घांक समाविष्ट आहेत.
ह्या तीनही एकांकिका दिग्दर्शनाभिमुख
व चित्रपट-तंत्राकडे झुकणाऱ्या आहेत.
एकाच वेळीं रंगमंचावर एकापेक्षा अधिक
दृश्ये किंवा एका दृश्याचं दुसऱ्या दृश्यात
विलीनीकरण ( Dissolve ) असे प्रयोग ह्यात
योजलेले आहेत.

वाचताना सदर एकांकिका सोप्या व्हाव्यात,
म्हणून बरीचशी काळजी छापण्यापूर्वी
'मॅजेस्टिक'च्या श्री. रवि कोठावळे व श्री. वेल्हाळ
ह्यांनी घेतलेली आहेच.

तसेच सदर एकांकिकांत संवाद
वाचताना 'जर्क' जाणवू नये, म्हणून
काही ठिकाणी पहिला, दुसरा, तिसरा
इत्यादी पात्रे संबोधली आहेत.
परंतु एकांकिका बसवताना दिग्दर्शक
'कॉम्पोझिशन'साठी आवश्यक वाटेल,
ध्वनी-दृश्य परिणामासाठी योग्य वाटेल,
त्याप्रमाणे संवादांची विभागणी करण्यास
स्वतंत्र आहे. तसेच पात्रांच्या संख्येवरही
कोणतेच बंधन नाही.
असो.
सदर एकांकिका बसवण्यापूर्वी माझ्याशी
संपर्क साधावासा वाटला ( प्रत्यक्ष किंवा पत्ररूपाने ),
तर आपले स्वागतच होईल !

फिल्म इन्स्टिट्यूट, पुणे–४.

राजा ठाकूर

म. ग्रं. सं. ठाणे, ...
दा. क्र. २०५६६ नों. दि. २१७११५७
वि. ...४१२८ क्र. ...

# मरण गोष्ट

[ रंगमंच उजळतो. रंगमंचावर भजनी मंडळी दिसतात. त्यांत दोन स्त्रियांचा समावेश आहे. एका लयीत भजन चालू आहे.
काही वेळानंतर ' आपुले मरण पाहिले म्यां डोळा ' ही ओळ निरनिराळ्या आलापांमध्ये रिपीट होते. भजन थांबते. ]

बुवा : नमस्कार, मंडळी ! साक्षात परमेश्वराचे नामस्मरण करून मी आजच्या प्रवचनास सुरुवात करतो. परमेश्वराचे स्मरण अशासाठी, की तोच आपला दाता आहे; आपला त्राता आहे; आपला पिता आहे, आपली माता आहे. थोडक्यात, आपण सारी त्याची लेकरे आहोत. त्यानेच आपल्याला निर्माण केले आहे. त्यानेच आपल्याला हा मानवजन्म दिला आहे. ही सारी त्याची माया आहे. बोला... (' श्रीराम जयराम जयजराम 'चा उद्घोष ) आपण जसे जन्माला आलो, तसेच आपल्याला एक दिवस त्याचे बोलावणेही येते. आपला देह, हे शरीर नश्वर आहे. ते कधी तरी नष्ट होणारच. ह्यालाच मृत्यू असे म्हणतात. तर सज्जन स्त्री–पुरुष हो, आजच्या प्रवचनाचा विषय आहे मृत्यू, मरण.

( भजन. बाकी सारे साथ देतात. )
मरण मरण, हो, मरण
मरण चुकले, हो, कुणाला ?

मरण चुकले नाही शनेशाला
मरण नाही चुक ——

मरण चुकले नाही नाम्याला
नाही चुकले माझ्या बापाला
मरण, मरण, हो, मरण...

मरण चुकले नाही कोणाला
मरण चुकणार नाही मला
चुकणार नाही तुम्हांला
चुकणार नाही ज्याला त्याला
मरण मरण, हो, मरण–
मरण चुकले, हो, कुणाला ?

मरण चुकणार नाही सर्वांना
मरण फारच, हो, दुष्ट
मरण भारीच, हो, खाष्ट
मरण...मरण...मरणगोष्ट...

[ प्रवचन रंगात आले असतानाच एक तरुण ऑडिटोरियममधून स्टेजवर येतो. ]

तरुण : स्टॉप इट्... स्टॉप इट्! थांबवा हे सारं! (सर्व शांत.)

बुवा : हे तरुण पुरुषा, का बरं थांबवायचं हे सारं ?

तरुण : महाराज, तसदीबद्दल क्षमस्व. आपणांस जर राग येणार नसेल, तर एक प्रश्न विचारू का ?

बुवा : विचार विचार. जरूर विचार. मी तुझं जरूर जरूर शंकानिरसन करेन.

तरुण : महाराज, आपण कोणासमोर प्रवचन करीत आहात ?

एकजण : ही समोर बसलेली माणसं तुम्हांला दिसत नाहीत का ?

दुसरा : का डोळ्यांना झापड लावलं आहे ?

एक स्त्री : का अंधशाळेतून पळून आला आहात ?

तरुण : माफ करा, बंधूंनो आणि भगिनींनो! मी अंधशाळेतून पळून आलेलो नाही, की डोळ्यांना झापडही लावलं नाही. लीव्ह इट्. आपण मुद्द्यावर येऊ.

बुवा : सज्जन पुरुषा, काय गफलत झाली आहे, ती लवकर कथन कर. निष्कारण माझा, माझ्या भजनी मंडळीचा आणि जमलेल्या माझ्या रसिक भक्तांचा वेळ घेऊ नकोस.

तरुण : महाराज, तुमचा आणि तुमच्या भजनी मंडळींचा अमूल्य वेळ घेतल्याबद्दल जाहीर क्षमस्व. आता तुमच्या जमलेल्या रसिक भक्तांबद्दल...त्यांचा वेळ घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

सर्व : का ?

तरुण : कारण त्या सर्व रसिक भक्तांची वेळ संपली आहे.

सर्व : काय ? वेळ संपली ?

तरुण : होय, वेळ संपली. (असं म्हणत एक्झिट.)

[ ' वेळ संपली ', वेळ संपली ' असे एक एक जण म्हणतो. बुवा जातो. नंतर सर्वजण कोरसमध्ये ' वेळ संपली ! –' ' समय खतम् ! .' टाइम इज अप् ! ' म्हणतात.

तेवढ्यात एक जण प्रवेश करतो. तो प्रेक्षकांकडे पाठ करून कलाकारांना उद्देशून बोलतो. ]

तरुण : माझ्या कलाकार मित्रांनो, आजचा कार्यक्रम काही अपरिहार्य कारणांमुळे रद्द करण्यात आला आहे. तसदीबद्दल क्षमा मागतो.

एकजण : अहो, कंत्राटदार, नुसतं अपरिहार्य कारणामुळे प्रयोग रद्द, असं म्हणून चालणार नाही. स्पष्ट काय ते बोला.

तो : परंतु......

दुसरा : आम्हांला कारण कळलंच पाहिजे.

तो : मग ऐका तर. तुम्ही प्रयोग कुणासमोर करणार आहात ?

तिसरा : व्हॉट डु यू मीन...?

तो : असं रागावू नका.

व्यथा : परंतु प्रयोग तर फुल होता.

तो : होय. प्रयोग हाऊसफुल्ल होता, परंतु...परंतु...अचानक...

एकजण : बोला......बोला......

दुसरा : लवकर बोला......

तिसरा : स्पष्ट बोला......

तो : परंतु अचानक काय झालं, कोण जाणे, प्रयोगाला आलेल्या सर्व प्रेक्षकांनी आता दहा मिनिटांपूर्वी माना टाकल्या.

एक स्त्री : म्हणजे ?

तो : सारे जण मरण पावलेत. सर्वांचे आत्मे पंचत्वात विलीन झालेत. हे सारं अचानक घडलं.

एक : खोटं आहे हे सारं !

दोन : असं कधीच होऊ शकत नाही !

तीन : धिस इज हायली इंपॉसिबल !

तो : ओ, शट अप्. कीप मम् ! (सर्व शांत. तो स्टेजवरचा पडदा उघडल्याचा अभिनय करतो.) बघा, डोळे उघडे ठेवून भरभरून बघा ! तो समोर पडलेला प्रेतांचा खच. (सर्वजण अवाक् होऊन बघतात.) (तो उसासा सोडून) माय् गॉड !

स्त्री : देवाची अमोघ लीला म्हणतात, ती आजच बघायला मिळाली.

तो : सारे मेले, साऱ्यांचे आत्मे उडून गेले भुर्रकन् पंचत्वात. साऱ्यांचे चेहरे कसे निस्तेज दिसताहेत ! पण डोळे ? प्रत्येकाच्या डोळ्यांत दिसत आहेत, चमकत आहेत रंगीबेरंगी स्वप्नांच्या, आशा-आकांक्षांच्या मधाळ चांदण्या ! ते...ते... प्रेत फक्त तीन-चार वर्षांचं; पण स्वप्न म्हणजे काय, हे कळलेलं दिसतंय् बछड्याला. डॉक्टर, नाहीतर इंजीनियर व्हायचं असेल बेट्याला. आणि ते प्रेत...पंधरा-सोळा वर्षांचं ! आताच कुठं उमजायला लागलं असेल. जीवन म्हणजे काय ? पण त्या अगोदरच कळला त्याला मृत्यू. दैव त्यांचं आणि ते...नुकतंच लग्न झालेलं दिसतंय् तिचं. अजून धड नवऱ्याचा स्पर्श सुद्धा ओळखीचा झाला नसेल ! हे सज्जन मृत स्त्री–

पुरुषहो, माझी आपणांस श्रद्धांजली. आपल्या पिंडास लवकर शिवो, ही त्या कावळ्यास साश्रु नयनांनी प्रार्थना. आपणांस सद्गती लाभो.

[ मरण... मरण... मरण... ओळी रिपीट.
झाल्या प्रकाराची इन्स्पेक्टर ' क्ष ' चौकशी करीत आहेत. ]

क्ष : ( सभोवताली नजर टाकून ) हं... एकंदरीत हा असा प्रकार आहे, तर! ( डायरी काढून त्यात काही लिहितो. ) एकूण किती प्रेते आहेत ?

कंत्राटदार : अजून मोजली नाही, सर.

क्ष : अच्छा ! ( थांबून ) पण तुम्ही काउंटिंग करायला हवं होतं ! काही हरकत नाही. माझी माणसं येऊन मोजतील आता. अरे, सखाराम...

कंत्राटदार : कशाला ? आम्हीच मदत करतो.

क्ष : असं म्हणता ? काही हरकत नाही ( उठत ) लेट अस, स्टार्ट ! वेळ कशाला ?

[ तेवढ्यात ऑडिटोरियमच्या दरवाज्यातून एकजण (ब) ओरडतो. :
' थांबा, साहेब ! मी आलोय्. मी सांगतो, किती प्रेतं आहेत, ते. ' ]

क्ष : तुम्ही सांगता ? कोण तुम्ही ?

ब : साहेब, मी बुकिंग क्लार्क. आजच्या प्रयोगाचं बुकिंग मीच केलं आहे.

क्ष : असं ? चला, बरं झालं. फालतू कष्ट वाचले. अरे, तुम्ही या ना इकडे. बोला, किती आकडा ?

ब : साहेब, टोटल दोनशे.

क्ष : आय् सी. टू हंड्रेड ! ( डायरीत टिपतो. )

[ दरवाज्यातून आणखी एकजण ( ड ) ओरडतो :
' दोनशे अडतीस, साहेब ! ' ]

क्ष : दोनशे अडतीस ?

ड : होय, साहेब, दोनशे अडतीस माणसे मी सोडली.

क्ष : तू सोडलीस ?

ड : होय, साहेब...

क्ष : का ? तू कोण आहेस ?

ड : मी डोअर–कीपर आहे, साहेब...

क्ष : ओऽह, आय् सी, ओ. के. टू हंड्रेड थर्टी अेट! (परत डायरीत टिपतो.) हं...तरीही ह्यात एक प्रॉब्लेम आहेच की.

ड : कोणता, साहेब ?

क्ष : ह्यांत स्त्रिया किती ? पुरुष किती ? आणि लहान मुलं किती ?

ड : हं. ते सांगणं मात्र कठीण आहे, साहेब.

क्ष : ते मी तुम्हांला कोठे विचारतो आहे ? तुम्ही जाऊ शकता आता. थँक्यू –

ड : मेन्शन नॉट ! (दोघेही जातात.)

कंत्राटदार : मग पुरुष, स्त्रिया आणि मुलं ह्यांची संख्या कशी काढायची ?

क्ष : त्याकरिता काउन्टिंगच करावं लागेल.

कंत्राटदार : करू या मग –

क्ष : अं... (विचार करून) तूर्तास राहू द्या.

कंत्राटदार : का ?

क्ष : कारण मग शारीरिक खाणाखुणा, वय वगैरे भानगडी आहेतच. लीव्ह इट्. ते नंतर होईल. त्यापेक्षा महत्त्वाचा प्रश्न हा आहे, की हे सारं घडलं कसं ?

कंत्राटदार : हो ना. एकदम अशी अचानक दोनशे अडतीस माणसं मरणं म्हणजे काही साधी गोष्ट नव्हे.

[ स्टिल. कोरसमध्ये ' साधी गोष्ट नव्हे मरण–मरण–मरण गोष्ट ' या ओळी रिपीट.

रंगमंचावर दोन्ही कोपऱ्यांतून... ' जानेवाले कभी नहीं आते हैं.

जानेवाले की याद आती है...' ह्या ओळी कोरसमध्ये ऐकू येतात.
'दिल एक मंदिर है' ह्या शब्दाचा उच्चार 'राम बोलो, भाई राम'च्या तालावर करतात.
प्रेत ठेवतात. चौघे चार दिशांना तोंड करून उभे.]

: हे मृत्यू!
आम्हां पामरांचे लक्षावधी
अक्कडबाज हात
गळून पडलेत
तुझ्या विस्तीर्ण पायांच्या
अक्राळ विक्राळ नखांवर
: त्याने आम्हांला नतमस्तक केलं, पण तू–तू तर मस्तकच उडवलंस.
: क्षितिजाच्या क्षितिजापर्यंत पसरलेले पिसाट पिसांचे पंख
: तुझे सावट फिरत आहे.
: प्रत्येक घरावर
: प्रत्येक दारावर...
: प्रत्येक वस्तूवर...
: प्रत्येक प्राण्यावर–
: प्रत्येक माणसावर–
कोरस : प्रत्येकाच्या प्रत्येक सावलीवर–
: तुझी अगाधता पटली आहे महाभारताला–
: रामायणाला–
: वेदाला–
: ऋग्वेदाला–
: प्रत्येक दिवसाला-
: प्रत्येक मिनिटाला-
: आणि काळाला–
: काळचक्र सुद्धा थांबवतोस तू! तू अमर आहेस!
: विज्ञानसुद्धा जाऊ शकत नाही तुझ्या दोन बोटांच्या सीमारेषेपलीकडे–

: सारी क्षितिजं झुकतात तुझ्याच पायांवर—

: मग आम्ही कोण ?...

: या पृथ्वीवर वावरणारी जिवंत प्रेतं ! फक्त जिवंत प्रेतं !

[ लोकल चालल्याचं दृश्य. खारे दाणे, गोळ्या, पाव—वडे विकणारे, तसेच भिकारी फिरत आहेत. गाडीत बरीच गर्दी आहे. तशातही एकजण सिगरेट पीत आहे. ]

प्रवासी : ( सिगरेट पिणाऱ्यास ) का, हो, सिगरेट पिता ?

[ सिगरेट पिणारा ढिम्मपणे सिगरेट पीत आहे. ]

प्रवासी : का, हो, ऐकू येत नाही का ? गाडीत सिगरेट पिण्यास मनाई आहे.

सिगरेट पिणारा : तू कोण सांगणारा मला ?

प्रवासी : ए, नीट बोल. तुझ्या बापाच्या वयाचा मी.

सिगरेट पिणारा : ए टकल्या ! चूप, बे !

प्रवासी : ( हात उगारतो. ) हरामखोर !

[ मारामारी होते. इतर प्रवासी मध्यस्थी करू लागतात. तेवढ्यात कोपऱ्यात आग आगते. आग पसरत जाते. एकेक जण 'आग...' म्हणत खाली कोसळतो. ]

रेडिओ न्यूज : आकाशवाणी, आज सकाळी नऊ वाजून बेचाळीस मिनिटांनी कुर्ल्याहून व्ही.टी.ला जाणाऱ्या फास्ट लोकलच्या एका डब्यात आग लागल्याने दोनशे बारा प्रवासी मृत्युमुखी पडले. आगीच्या भीतीमुळे चालत्या गाडीतून ब्याण्णव प्रवाशांनी उड्या मारल्या. विरुद्ध दिशेने येणाऱ्या लोकलखाली हे जीव सापडले आणि मृत्युमुखी पडले.

आगीत जळून एकशे वीस प्रवासी भस्मसात झाले. रेल्वेच्या प्रवक्त्याने सांगितल्यानुसार अद्यापपावेतो फक्त तीन प्रेतांची ओळख पटली आहे. आगीचे कारण समजू शकले नाही. ईश्वर मृतात्म्यांस शांती देवो.

[ ' ईश्वर मृतात्म्यांस शांती देवो, ' हे वाक्य घुमत जाते. ]

कोरस : मग आम्ही कोण ?
मृत्यूच्या खाईत वेगाने पडणारे किडे, फक्त किडे...फक्त किडे..

[ एक विमान चालले आहे. मजेत, व्यवस्थित. थोड्या वेळाने विमान डचमळण्यास सुरुवात होते. पायलट घाबऱ्याघुबऱ्या मशीन बघतो. ]

एअर होस्टेस : युवर अटेन्शन प्लीज, यू आर् रिक्वेस्टेड् टु फासन् युवर बेल्ट्स्, क्लोज द विंडोज्. प्लीज क्विक अप्! युवर प्लेन इज इन ट्रबल, अँड इन डेंजर. थँक्यू... बेस्ट ऑफ लक्, गॉड ब्लेस यू...

[ विमान कोलमडत खाली पडते. एकच हाहाकार होऊन मग शांत. ]

रेडिओ न्यूज : नुकत्याच हाती आलेल्या बातमीनुसार एक दुःखद घटना कुलाबा जिल्ह्यातील मिरोली येथे घडली. एका टेकडीवर इंडियन एअर लाईन्सचे पुण्याहून मुंबईला येणारे विमान कोसळले. या भीषण अपघातात सर्व म्हणजे चव्वेचाळीस प्रवासी व चार कर्मचारी ठार झाले आहेत. आतापावेतो वीस प्रेतांची ओळख पटली आहे. त्यांतील फक्त चार प्रेते ओळख पटायच्या अवस्थेत होती. झालेल्या दुर्घटनेविषयी राष्ट्रपती व पंतप्रधान यांनी आपल्या दुःखद भावना प्रकट केलेल्या आहेत. ईश्वर मृतात्म्यांस शांती देवो.

[तीन वेळा हे वाक्य म्हटले जाते.]

कोरस : मग आम्ही कोण ?
वादळी वाऱ्यावर भरकटणारा पालापाचोळा! फक्त पालापाचोळा !

[रंगमंचावर पाण्याचे प्रचंड लोट आल्याचे आभास. एकेकजण हळूहळू बुडत निष्प्राण होत आहे. काही वेळाने सर्व शांत होते. फक्त पाण्याच्या प्रचंड लोटाचे आवाज.]

रेडिओ न्यूज : एक दुःखद वार्ता. सौराष्ट्रातील मोरवी ह्या गावाजवळील मोरवी क्रमांक दोन हे मातीचे धरण फुटल्याने आलेल्या प्रचंड पुरामुळे पाच हजार लोक मृत्युमुखी पडल्याचे हिंदुस्थान समाचारने कळवले आहे. ही घटना अनपेक्षित आणि अचानक घडल्याने बेसावध लोक बळी पडले. वारा व पावसामुळे मोरवीशी संबंध ठेवणे अशक्य झाले आहे. हेलिकॉप्टर आणि विमानांतून पूरग्रस्तांना मदत पोहोचविण्याचे काम लगेच सुरू करण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांनी मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे.

['ईश्वर मृतात्म्यांस शांती देवो' हे वाक्य तीन वेळा म्हटले जाते.]

: या विशाल भवसागरात अज्ञाताच्या जाळ्यात सापडलेले सापळे... फक्त...सापळे...

['मरण... मरण... मरण...' ह्या ओळी रिपीट. रंगमंचावर 'दै. भ्रमर,' ... 'दै. देशदूत'... 'लोकसत्ता' इत्यादी वर्तमानपत्रे विकणारी मुले ओरडतात. ते सर्व एका कोपऱ्यात बसतात. एक स्त्री कोपऱ्यात उभी आहे. कोपऱ्यात टी. व्ही. आहे.]

स्त्री : शैला रानडे आपल्याला बातम्या देत आहे. आताच हाती आलेल्या

ताज्या बातमीनुसार ××× येथे ××× ह्या नाट्यगृहात नाटक बघण्यास आलेले दोनशे अडतीस प्रेक्षक अचानक मृत आले. ते मृत कसे झाले, हे शास्त्रज्ञांना समजू शकले नाही. हा काही तरी गूढ प्रकार असावा, असा नागरिकांचा अंदाज आहे. ह्या निमित्ताने येथे एक शोकसभा आयोजित करण्यात आली आहे. ईश्वर मृतात्म्यांस शांती देवो.

[ शोकसभेचे दृश्य. ]

एकजण : माझ्या कैलासवासी बंधूंनो आणि भगिनींनो, (चाचरत) खरं म्हणजे झालेल्या दुर्घटनेविषयी बोलायला शब्दच सापडत नाहीत. देव कधी कधी किती निष्ठुर होतो, हे आपल्याला ह्याही प्रसंगातून आढळतं आहे.

प्रेक्षकांमधून आवाज : अहो, पण आम्ही मेलो कसे, याची चौकशी व्हायलाच पाहिजे !

एकजण : होय, होय ! तुमची मागणी रास्त आहे. त्याचकरिता एक चौकशी समिती नेमण्यात आली आहे. त्या चौकशी समितीत खुद्द माझा, ×× ह्यांचा, डॉ. ×× ह्यांचा आणि ॲड. ×× ह्यांचा समावेश आहे. तेव्हा हे गूढ नक्कीच उकलेल, ह्यात वादच नाही. ईश्वर मृतात्म्यांस शांती देवो. आपल्या नातेवाइकास प्रत्येकी एक हजार रुपये देण्याची सोय करण्यात आली आहे. जय हिंद.

[ चौकशी समिती बसली आहे. काही तरी चौकशी चालू आहे. तेवढ्यात ऑडिटोरिअमच्या दरवाज्यातून एक तरुण (ब) प्रवेश करतो. ]

ब : (प्रेक्षकांना उद्देशून) खुपसा ह्या प्रत्येकाच्या दंडात त्या प्रचंड सुया ! काढून घ्या प्रत्येकाचं सर्व रक्त. आणि भरा त्या बाहेरच्या पिंपामध्ये. प्रत्येकाचं फक्त उरलं पाहिजे मांस... बहिरी ससाण्यांसाठी आणि

शिल्लक राहिली पाहिजेत फक्त हाडं– पोलिसांच्या कुत्र्यांकरिता. ( बरोबरच्या माणसांना उद्देशून ) चला, सुरुवात करा !

चौकशी समितीतील एकजण : ओह् ! नो, स्टॉप इट्, हॉरिबल !

[ प्रेक्षकांमधून : " आम्ही आमचे रक्त देणार नाही ! पकडा त्यांना ! " असे आवाज.
' व 'ला पकडून आणले जाते. ]

एक जण : कोण आहेस तू ?

व : मी ह्या नाटकाचा हीरो.

समितीतील एकजण : व्हॉट ?

व : मी तुम्हांला सर्व सांगतो. नव्हे, सांगितलं पाहिजे हे सारंच. मला पकडून आणलं, म्हणून ह्या नाटकाचं गूढ मी सांगत आहे, असा गैरसमज करून घेऊ नका. अच्छा, दॅटस् ऑल, पण आपली ओळख ?

: ह्या गूढ नाटकाचे गूढ उकलण्यासाठी आमची नेमणूक झाली आहे. आम्ही चौकशी समितीचे सदस्य आहोत.

व : ओ ! आय् सी. ग्लॅड टु मीट यू. एकंदरीत मला तुमच्या नजरांवरून वाटत होतंच.

दोन : काय ?

व : नाही. ' जंजीर 'मध्ये अमिताभ बच्चनला जेव्हा अजित सापडतो, तेव्हा तो अशाच नजरेने बघत होता. हं. येथे फरक एवढाच, की अजित एक आणि अमिताभ बच्चन तीन. पण ह्या नाटकाचा हीरो काही झालं, तरी मीच आहे.

[ तिघे जण उठून त्याला घेरतात. ]

एक : आपलं नाव ?
दोन : राहता कुठं ?
तीन : करता काय ?
ध : हं हं हं. प्रश्न एक एक विचारा. चौकशी अशी करायची नसते. मला वाटतं, चौकशी समितीवर तुमची प्रथमच नेमणूक झाली असावी. असो. परंतु तुम्ही विचारायची गरज नाही. मी सारं काही सांगून टाकतो.
एक : हरी अप!
ध : होय, होय. मला पण घाई आहे. तत्पूर्वी एक गूढ सांगून टाकतो.
दोन : आता आणखी काय ?
ध : (प्रेक्षकांकडे बोट दाखवून) हे सुद्धा बरोबर जातील, तर आता गोष्ट...गोष्ट...गूढ गोष्ट...ह्या साऱ्यांची मरणगोष्ट.

[ मरण...मरण...मरण ' ओळी रिपीट होतात.

एक वऱ्हाड चाललं आहे, ट्रकमधून. वऱ्हाड श्रीमंत आहे. थोड्या वेळानं एका वळणावर ट्रक उलटतो. वऱ्हाडाचा प्रमुख व डॉक्टर (ध) येतात. ' ध ' काही प्रेतांची तपासणी करतो. ]

: डॉक्टर, काही उपाय ?
ध : आहे. यांतील कोणीही मेलेलं नाही. साऱ्यांचे प्राण कंठाशी आलेले आहेत. साऱ्यांचे आत्मे मृत्यूच्या दाराशी घुटमळत आहेत.
: उपाय काय, डॉक्टर ?
ध : सांगतो. किती देणार ?
: (विचार करून) पंचवीस हजार...
ध : मरणोन्मुख आहेत. दोनशे सदतीस जण. जिवंत करायचे आहेत.
: अं... (विचार करून) एक लाख.
ध : ओ. के.
: उपाय काय, डॉक्टर ?
ध : नुकत्याच मेलेल्या माणसांचं रक्त हवंय.

: (आश्चर्याने) व्हॉट ?

ध : होय, तावडतोब.

: पण...पण...कुठून आणायचं नुकत्याच मेलेल्या माणसाचं रक्त ? आणि त्याचं कारण ?...

ध : तुमचं ऐश्वर्य, तुमची संपत्ती, तुमचा अहम्, एनी वे, नुकत्याच मेलेल्या माणसांच्या रक्तांची व्यवस्था मी करतो.

: तुम्ही...?

ध : होय... किती ?

: अं...एकूण पाच...

ध : गुड ! ... : मांसल मातीचे गोळे... (असे तीनदा म्हणतो.)

[ चौकशी समितीसमोर. ]

ध : मी अतींद्रियाचा विद्वान आहे. मला जाणवलं, की ह्या नाट्यगृहात दोनशे सदतीस प्रेक्षक उपस्थित आहेत. नाटक चालू होण्यापूर्वी मी येथे पोहोचलो. तिकीट काढलं, म्हणून प्रेक्षकांची संख्या दोनशे अडतीस झाली. मी नाट्यगृहात आलो आणि नाट्यगृहात अणुबॉम्ब टाकला.

: अणुबॉम्ब ?

ध : होय, अणुबॉम्ब, की ज्या अणुबॉम्बचा आवाजही होत नाही आणि वासही येत नाही. मी अणुबॉम्ब टाकला आणि साऱ्या प्रेक्षकांनी आपल्या माना टाकल्या.

कोरस : पण तुम्ही कोण ?

ध : मी ? (हसतो.)

फक्त मांसल मातीचा गोळा
मांसल मातीचा गोळा
मांसल मातीचा गोळा

[ 'मरण मरण, हो, मरण, मरण चुकले हो कुणाला?' हे गीत रिपीट होते. ]

कोरस : ...विज्ञान सुद्धा जाऊ शकत नाही तुझ्या दोन बाबूंच्या सीमारेषे-रे पलीकडे...

सारी क्षितिजे झुकतात तुझ्या पायांवर.

कोरस : मग आम्ही कोण ?

: फक्त मांसल मातीचे गोळे...

## फ्रॉग्ज्

[ कॉलेजचा परिसर...परीक्षेच्या अगोदरची गडबड–दोन–तीन ग्रूप्स् चर्चा करताना दिसतायत. तर एक–दोन जण स्वतंत्रपणे अभ्यास करताना दिसतायत, इ. इ....

बेल होते

सर्वजण गडबडीने परीक्षा हॉलमधे येतात.

बाकांवर 'कॉपी' लिहिणे इ. प्रकार सुरू आहेत. एकमेकांना 'बेस्ट ऑफ लक' देणं इ. सुरू आहे.

दुसरी बेल होते. प्रश्नपत्रिका–वाटप सुरू होते.

'ओ ! व्हेरी हार्ड !'

'सिलॅबसच्या बाहेरचं आहे.'

'ए, प्लीज हेल्प मी.'

इ. संवाद होतात.

कोणी बेंचवरून पाहून लिहितात. कोणी खिशातून कपटा काढून लिहितात. कोणी पुढेमागे बघून लिहितात. कोणी बाजूच्याला विचारतोय् इ. इ.

तेवढ्यात सीनियर सुपरवायझर प्रवेशतात. ते एकेका रांगेतून फिरत आहेत. त्यांची जसजशी पाठ वळते, तसतसे विद्यार्थी परत कॉपी सुरू करतात. एके ठिकाणी ते वळायला व एक मुलगा बाजूच्या मुलाकडून कॉपी घ्यायला एकच गाठ पडते. ]

सी.सुपरवायझर : व्हॉटीज गोईंग ऑन ?

तो मुलगा : एक्झामिनेशन, सर !

एकजण : उमरखय्याम म्हणतो, लाईफ इज नथिंग, ओन्ली वुमन अँड वाईन,

तर शेक्सपियर म्हणतो, लाईफ इज ए टेल टोल्ड बाय ॲन ईडियट् किंवा लाईफ इज ए स्टेज, किंवा श्रीकृष्ण म्हणतो, जीवन म्हणजे रणांगण किंवा संत तुकाराम म्हणतात, जीवन म्हणजे भवसागर आहे आणि डॉनसारखा जगप्रसिद्ध जुगारी म्हणतो, लाईफ इज ए गॅम्बलिंग. कोणी काहीही म्हणो, पण आम्ही म्हणतो, लाईफ इज नथिंग बट् एक्झॅमिनेशन ! होय, फक्त परीक्षा, मग ती शाळेची असो, कॉलेजची असो, युनिव्हर्सिटीची असो किंवा लग्नाच्या बाजारातील वधूपरीक्षा असो अथवा क्षणोक्षणी, घडोघडी नियती घेत असते, ती असो. प्रत्येक पावलागणिक माणूस परीक्षेच्या एकेका पायरीवरून पुढे जात असतो, नाहीतर गडगडत खाली तरी येतच असतो. जाऊ द्या. हे फारच फिलॉसॉफिकल झालं, कॉम्प्लिकेटेड् झालं. तर आता येथे जे काही सुरू आहे, ती ही परीक्षाच आहे. कुठली ? कुठलीही ! सीनियर सुपरवायझर ज्यूनियर सुपरवायझरला चांगलाच दम भरून गेलेत, पण ते बिचारे तरी काय करणार ? आणि परत ते असतात तरी कोण ? तर पोस्ट ग्रॅज्युएशनचे विद्यार्थी किंवा फ्रेश ग्रॅज्युएट्स् ! तेही अशाच परीक्षा–पद्धतीतून पुढे गेलेले. असो. पुढे तुम्हीच पाहा. तो कोपऱ्यातला हीरो विद्यार्थी, ती मधल्या रांगेत तिसऱ्या बेंचवर बसलेली ब्यूटीक्वीन किंवा हा सर्वांत मागच्या बेंचवरच्या टग्या, तिघंही सरळ सरळ गाईड-मधे पाहून पेपर लिहीत आहेत. त्या हीरोला ज्यूनिअर सुपरवायझरनं रेड–हॅंडेड्‌ पकडलं. पण तो सुटला, कारण ज्यूनिअर सुपरवायझरच्या मुटीत त्यानं शंभराची नोट दाबली. ती ब्यूटीक्वीनही रेडहॅंडेड् सापडली, पण तीही सुटली, कारण तिनं त्या ज्यूनि. सुपरवायझरला संध्याकाळी कॉफी हाऊसची अपॉईंटमेंट दिलीय्. तो टग्याही पकडला जातोय्. अं हं. तो खिशातून कॉपीचा कागद काढत नाहीये, तर चांगला हातभर लांब रामपुरी काढतोय्. उघडच आहे, तोही सुटला.

[ मग बेलचा आवाज. टग्या 'सुटलो !' म्हणून उठतो. तसे एकेक जण 'सुटलो, सुटलो' म्हणून उठतात. ]

एकेक जण : काय, कसा गेला पेपर ?
: बिनधास्त !
: तुला, रे ?
: सॉलिड !
: तुला कसा काय गेला, ग, पेपर ?
ब्यूटीक्वीन : टॉप !
: मग अशी नाराज काय दिसतेस ?
ब्यूटीक्वीन : संध्याकाळच्या पेपरचा विचार करतेय्, ग !

[ स्टिल.
त्यातून एकजण पुढे येतो. ]

दुसरी : कोणत्याही फायलम्‌मधला कोणताही प्राणी घ्या. त्याची जन्मापासून मृत्यूपर्यंत वाढ होतच असते. हा नियतीचा चमत्कार नाही, तर निसर्गाचा नियमच आहे. माणूसही त्याला अपवाद कसा असणार ? नाहीच, पण तरीही माणूस इतर प्राण्यांच्या तुलनेत एक प्रचंड अपवाद आहे. माणूस विथ बॅकबोन तर आहेच, पण निसर्गानं त्याला मेंदू नामे एक वेगळीच चीज बहाल केली आहे. इतर प्राण्यांना निसर्गानं जसा भुकेचा शाप दिलेला आहे, तसाच माणसालाही दिलेला आहे. परंतु ही भूक दुहेरी आहे. होय ! एक पोटाची आणि दुसरी या मेंदू नामे वस्तूची. या मेंदूच्याच भुकेतून निर्माण झालं ज्ञान. या ज्ञानाच्याच भुकेतून निर्माण झाली अनेक युद्धं, अनेक चळवळी आणि औद्योगिक क्रांतीसारख्या अनेक क्रांत्या. ज्ञानाच्या कक्षा विस्तारित करण्यासाठी शिक्षण सुरू झालं, शरीर पिळदार बनविण्यासाठी जशा व्यायामशाळा सुरू झाल्या, तसं. ( गुरुकुलाचं दृश्य येथून सुरू.) पूर्वी म्हणजे रामायण-महाभारताच्या काळात हे शिक्षण फक्त मर्यादित जातींसाठी, घराण्यांसाठी होतं. विद्यार्थी त्याकरता गुरुकुलात जायचे आणि गुरूंची गृहस्थाश्रमात प्रवेश करेतो सेवा करायचे.

[ पूर्वीच्या गुर्वाश्रमाचे दृश्य. तीन-चार शिष्य गुरूंचे पाय चेपत आहेत. गुरू पुढीलप्रमाणे शब्द उच्चारतात, त्याप्रमाणे इतर विद्यार्थीही उच्चारतात.

स प्रयान : मनसा यातु युक्ताः
असनम् रथम् अनश्वम् !
विः रथः अन्तानम् दिवाः वाघते ।
मानसाः जवीयानम् मनोजवा । ]

एकजण : हळूहळू चातुवर्ण्याश्रमाच्या भिंती ढासळल्या, आणि शिक्षणाचा चेहरामोहराच बदलून गेला, अनेक धर्मांच्या, जातींच्या उगमामुळं, महत्त्वाकांक्षाही वाढल्या. युद्धांच्या संख्या वाढत गेल्या, आणि शिक्षण शस्त्रांच्या म्यानात अडकलं !

[ पार्श्वभागी – एकजण (गुरू) पाच-सहा शिष्यांना तलवारीचे हात शिकवीत आहे. ]

दोन : सामाजिक परिस्थितीचा स्रोत असा वळणावळणानं वळत वळत दोन महायुद्धांवर स्थिर झाला. माणसाला शांततेचं महत्त्व पटलं आणि त्याला जाणिवांचे पंख फुटले. माणूस जसजसा अंतर्मुख होऊ लागला, तसतसा शिक्षणाचा प्रसार वाढतच जाऊ लागला. शिक्षणाच्या मर्यादा वाढत गेल्या आणि ते चार भिंतींआड घुसमटणाऱ्या स्त्रीच्या पदरातही येऊन पडलं. शिक्षण, म्हणजे तिसरा डोळा. दोन डोळ्यांनी माणूस फक्त सभोवतालचं जग पाहू शकतो. परंतु या तिसऱ्या डोळ्याच्या सामर्थ्यानं माणूस क्षितिजाच्या पलिकडचंही पाहू शकतो. शिक्षणाचा उद्देश हाच; आणि म्हणून मग त्याचे टप्पे पाडले गेलेत, कप्पे पाडले गेलेत. मॉन्टेसरी, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, कॉलेज, इ. इ.

[ मॉंटेसरीचे दृश्य—मुले प्रार्थना म्हणतात.
'या कुन्देन्दु तुषार हार धवला...'

प्रा. शाळेचे दृश्य.
'अला काना आ, बला काना बा; कला काना का, ड ला काना डा...'

माध्यमिक शाळेचे दृश्य. ]

गुरुजी : (एका मुलास) शिवाजी महाराजांविषयी तुला काय माहिती आहे ?
मुलगा : त्यांनी त्यांची भवानी तलवार जपानमध्ये आनवून घेतली होती.

[ कॉलेजचे दृश्य—गाण्यांच्या भेंड्या चालू आहेत : ]

सूत्रधार : हा कॉलेजमधील एक वर्ग आहे. गैरसमज करून घेऊ नका. ऑफ पीरियड आहे. म्हणून गाण्यांच्या भेंड्या सुरू आहेत. आणि हे कंदिलाच्या मंद प्रकाशात सुरू असलेलं ग्रामीण परिसरातील प्रौढ शिक्षण...

[ प्रौढ शिक्षणवर्गाचे दृश्य. एक बाई गुरुजींजवळ येते व विचारते. ]

बाई : गुरुजी, अ ला काना आ व्हतो, ब ला काना बा व्हतो, क ला काना का व्हतो, ड ला काना डा व्हतो, मग इ ला काना काय व्हतं ?
सूत्रधार : गुरुजींनी कपाळाला हात लावला. साहजिकच आहे. याचं उत्तर त्यांच्याजवळ नाही आणि या प्रश्नाचं उत्तर कोणाजवळही नाही. तर असं हे शिक्षण सार्वभौम आणि समाजाभिमुख, सूर्यासारखं प्रकाश-दायी, अज्ञानाचा अंधार नष्ट करणारं, कोणी त्याला तिसरा डोळा म्हणतात. तर कोणी त्याला शिंग म्हणतात, परीक्षेच्या सापळ्या-मधूनच याचा मार्ग आहे.

[ स्टेजवर पाच-सहाजण बसलेले दिसताहेत. ]

सूत्रधार : हाही एक सापळाच. उत्तरपत्रिका तपासण्याचं पवित्र कार्य चाललंय् इथं.

[ कोणी तंबाखू मळतोय्, कोणी तपकीर ओढतोय्, तर कोणी सिगारेट्. ]

पहिला : अरेरे, काय पण घाण अक्षर आहे ! माझं सुद्धा एवढं घाण अक्षर नव्हतं, हो !

दुसरा : सौंदाणकर, मागच्या सेमिस्टरचे पेपर तपासताना तुमच्या चश्म्याचा नंबर एकनं वाढला होता, यावेळी आता दोननं वाढणार, वाटतं !

पहिला : बाय द वे, कुलकर्णी. तुमच्याकडे जळगावचे पेपर आहेत ना ?

दुसरा : नाही, देशपांड्यांना विचारा. त्यांच्याकडे आहेत.

पहिला : अहो देशपांडे ! जळगावचे पेपर तुमच्याकडे आहेत ना ?

तिसरा : होय.

पहिला : मग हिरव्या शाईनं लिहिलेल्या पेपरवर लक्ष ठेवा. माझा पुतण्या आहे !

तिसरा : बरं, बरं. बरं, क्षेत्रमाडे, तुमच्याकडे नासिकचे पेपर्स आहेत ना ?

क्षेत्रमाडे : नाही, हो. राजदेरकरांकडे आहेत.

तिसरा : अहो राजदेरकर, तुमच्याकडे नासिकचे पेपर्स आहेत ना ?

चौथा : अं...होय !

तिसरा : मग ज्या पेपरच्या प्रत्येक पानावर 'श्रीराम प्रसन्न, श्रीराम प्रसन्न' असं लिहिलेलं असेल, त्याला मार्कस् देताना चिक्कूपणा करू नका.

: का, हो ? आपले आचार्य अगदी शांतपणे बसलेत, पानाचं रवंथ करीत.

पहिला : अहो, तिकडे लक्ष देऊ नका, शांतपणानं कत्तल चाललेली दिसतेय् तिथं.

दुसरा : का ?

पहिला : अहो, त्यांच्या बायकोची डायव्होर्स–नोटिस आलेली आहे त्यांना !

[ सगळे हसतात. ]

सूत्रधार : पेपर्स तपासून झालेत. आणि आता हे बसतंय्, ते रिझल्ट बोर्ड.

निकालावर शेवटचा हात फिरवण्यासाठी.

[ स्टेजवर पाच-सहा जण बसलेले आहेत. मधे बसलेला बोलण्यास सुरुवात करतो. तो डायरेक्टर ऑफ द बोर्ड आहे. ]

डायरेक्टर : सो लेट् अस स्टार्ट दि वर्क. वाकटकर, फाईल द्या.

[ वाकटकर, त्यांचा क्लार्क, त्यांना फाईल देतो. ते फाईल चाळतात, पुढे— ]

डायरेक्टर : या वर्षीच्या प्राथमिक निकालांची कागदपत्रं माझ्या हाती आलेली आहेत. आणि या निकालांच्या अंतिम यादीनुसार पहिल्या तीस जणांमधे आलेल्या विद्यार्थ्यांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे: मुंबई : ११, पुणे : १४ आणि नासिक, जळगाव, नगर, धुळे नि औरंगाबाद येथील प्रत्येकी एकेक विद्यार्थी समाविष्ट आहे. मला अशी आशा वाटते, की आपण या निकालाशी सहमत व्हाल.

[ इतर सदस्यांची चुळबूळ सुरू होते. ]

दुसरा : माफ करा. पहिल्या पाच क्रमांकांची नावे कृपया उद्धृत करा.

डायरेक्टर : अं... हं. पहिला क्रमांक : मुकुंद केशव गोखले फ्रॉम पूना.
दुसरा नंबर— कु. सुलभा नरहरी अभ्यंकर, फ्रॉम पूना.
क्रमांक तिसरा : रॉबर्ट रॉडिक्स् फ्रॉम बॉम्बे.
चौथा क्र. : कु. स्नेहप्रभा गणेश सावरकर अगेन फ्रॉम पूना.
आणि क्रमांक पाचवा : संभाजी रावसाहेब पाटील फ्रॉम जळगाव.

तिसरा : ( मधेच उठून ) सहस्रबुद्धे... अं.... माफ करा. पण यावेळीही पुण्याचाच प्रथम क्रमांक आला, हे मला जरा संशयास्पद वाटतं !

डायरेक्टर : सोलंकी, आपल्याला काही संशय असेल, तर आपण गुणपत्रिका पाहू शकता. गुणवत्तेनुसार क्रमांक लावण्यात आलेले आहेत.

तिसरा : ते काहीही असो, परंतु हा अन्याय आहे. मागच्या वेळी पण पुण्याचेच फिफ्टीपरसेंटच्या वर कँडिडेट्स् होते आणि पहिले ओळीने आलेले तीन विद्यार्थीही पुण्याचेच होते. काही असो. यावेळी पहिल्या क्रमांकावर मुंबईचाच कँडिडेट हवा.

डायरेक्टर : मि. भट ! तुमची बाजू मला पटते, परंतु पहिल्या आलेल्या कँडिडेटच्या मार्कामध्ये आणि मुंबईच्या कँडिडेटमधे पॉईंट थ्री परसेन्टचा डिफरन्स आहे.

दुसरा : असू द्या. यावर काही तरी सोल्यूशन काढावंच लागेल.

चौथा : मला वाटतं, या निकालात ग्रामीण भागावर अन्याय झालेला आहे. विशेषतः, आदिवासी विद्यार्थ्यांवर ! हे एकूण देशाच्या धोरणाविरुद्ध आहे.

डायरेक्टर : मि. जाधव ! असं म्हणू नका. पेपर्स चेक करतानाच एक्झॅमिनर्सला आम्ही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या पेपर्सच्या बाबतीत उदार धोरण ठेवावं, अशा इन्स्ट्रक्शन्स् दिलेल्या होत्या. आपल्या माहितीसाठी मी असं सांगू इच्छितो, की एकूण ग्रामीण भागातून बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी ४२ टक्के विद्यार्थ्यांना सायन्स व अंकगणितासारख्या अवघड पेपरांमधे सात सात मार्कस् ग्रेस म्हणून दिलेले आहेत.

चौथा : मुद्दा तो नाहीये, मि. सहस्रबुद्धे. पहिल्या तिसांत ग्रामीण भागातील एकही विद्यार्थी नाही, हे सूर्यप्रकाशाइतकं सत्य आहे. आणि त्याचा भीषण परिणाम ग्रामीण शिक्षणावर होईल, याकडे आपण दुर्लक्ष करून चालणार नाही.

डायरेक्टर : मि. पवार ! पुढच्या मीटिंगच्या वेळी आपण या मुद्द्यावर आणखी सहानुभूतीने विचार करू या.

दुसरा : सहस्रबुद्धे, असाच सहानुभूतीचा दृष्टिकोन आपण मुंबईच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत का दाखवीत नाही ?

डायरेक्टर : मि. भट, तुम्ही आता जास्त न बोललेलंच बरं, पुण्याचे विद्यार्थी हुशार आहेत, ते पहिल्या तिसांत जास्तीत जास्त संख्येनं येऊ शकतात. तुम्ही इथं भांडण्यापेक्षा तुमच स्टॅण्डर्ड वाढविण्याचा का प्रयत्न करीत नाही ?

तिसरा : सहस्त्रबुद्धे, हे आपण आम्हांस शिकविण्याची गरज नाही. आपलं स्टॅण्डर्ड आम्हांला चांगलं माहीत आहे. गेली दोन वर्षे निकालात जे घोळ आणि गोंधळ सुरू आहेत, ते तुमच्यामुळंच आणि दुसरं महत्त्वाचं असं– या वर्षी आम्हांला मिळालेल्या अंतर्गत, अधिकृत, गुप्त माहितीनुसार पुण्याचे फक्त सात विद्यार्थी पहिल्या तिसांत होते आणि मुंबईच्या रॉबर्ट रॉड्रिक्स् याला सातशेपैकी सहाशे बारा, तर पुण्याच्या मुकुंद गोखलेला सहाशे अकरा मार्कस् होते. परंतु आपल्या निकालपत्रात त्याला मात्र त्याला सहाशे तेरा मार्कस् दिसताहेत. हे रहस्य काही आमच्या लक्षात येत नाही.

डायरेक्टर : हे पाहा, माझ्यावर काही निष्कारण आरोप करू नका. कोणत्याही परिस्थितीत मुंबईचा विद्यार्थी पहिला येणार नाही.

दुसरा/तिसरा : (एकाच वेळी) ते काही नाही, मुंबईचा विद्यार्थी पहिलाच यायला हवा! आणि पहिल्या तिसांत कमीत कमी पंधरा विद्यार्थी मुंबईचेच पाहिजेत.

तिसरा : असं असेल, तर मग विदर्भानं काय घोडं मारलं आहे, विदर्भाचा एकतरी कॅन्डिडेट हवाच!

चौथा : मग खानदेशाचेही एक–दोन विद्यार्थी हवेत.

[ गोंधळ वाढत जातो. तेवढ्यात फोनची बेल वाजते. सर्व शांत होतात. ]

डायरेक्टर : (फोन उचलून) कोण? खुद्द मंत्रीसाहेब? (सगळ्यांना उद्देशून) मंत्रालयातून फोन आलाय्.

[ फोन चालू असताना फक्त 'होय, अंऽऽहो, हो' असं म्हणतो. ]

डायरेक्टर : संभाजी रावसाहेब पाटील, बरं, साहेब. (फोन ठेवून सर्वांना उद्देशून) अं... माझ्या मित्रांनो, डायरेक्टर या नात्यानं मी आजचा निकाल जाहीर करतो. मघा सांगताना माझ्याकडून एक चूक झाली

होती. ती अशी, की यावर्षी जळगावचा संभाजी रावसाहेब पाटील सर्व विद्यार्थ्यांमध्ये पाचवा नसून पहिला आला आहे.

[ रंगमंचाच्या एका भागात मटका, बेटिंग घेणे इ. चालू आहे. ]

एकजण : दो रुपयेका पंजा, तीन रुपयेका छक्का, चार रुपयेका सत्ता.
दुसरा : चार रुपयेका एक्का, पाच रुपये की दुर्री...
तिसरा : पाच रुपयेकी तिर्री, छे रुपयेका चौका.

[ याच वेळी दुसऱ्या भागात काही विद्यार्थी रिझल्टची वाट पाहत आहेत. ]

एक : रिझल्ट आला का, रे ?
दुसरा : नाही अजून.
तिसरा : थांब, थोडा वेळ. येईलच आता.

[ एकदम स्टेजवर एकजण येतो. ' आला... आला ! रिझल्ट आला !' असे ओरडतो.
दोन्ही बाजूस एकच गोंधळ उठतो.
थोड्या वेळाने विद्यार्थ्यांच्या बाजूने एकेकजण बाहेर पडतो. ]

: च्यायला एका दान्याने मार खाल्ला, रे !
दुसरा : तरीच ! मला वाटलंच होतं, कटात मारेल, साला...
तिसरा : पण आपला पाच रुपयाचा घुसला, साला !

[ मटका बेटिंग ज्या बाजूने चालू आहे, तेथून एकेकजण बाहेर पडतो. ]

एक : साली, या वर्षीही काही सरस्वती प्रसन्न झाली नाही.

दुसरा : जाने दो. अब ऑक्टोबर में देखेंगे.

: ए, उमे, तुझं काय झालं, ग ?

: माझं ? पास. श्रीराम प्रसन्न.

[ यावेळी सगळे निघून जातात. शेवटी एकजण कोपऱ्यात असतो. दुसरा त्याला विचारतो. ]

: काय, रँग्लर परांजपे, तुम्ही तर काय, दुसरे साने गुरुजी, म्युनिसिपालटीच्या लायटाखाली अभ्यास करणारे, ब्रिलियंट विद्यार्थी ! तुम्ही फस्ट क्लासमधे पास झालाच असाल. मग ?... आता पुढं काय करणार ?

[ दुसरा निघून जातो. ]

पहिला : ( निराश हसत ) रँग्लर परांजपे, सानेगुरुजी, ब्रिलियंट... नापास झाले सगळे ? पुढं काय करणार ? नाही... तुमच्याकडे परीक्षा–फीची भीक मागत नाहीये मी, की इ.बी.सी.ची सवलतही मागत नाही. फक्त एका विषाच्या पुडीची भीक द्या, की जी माझ्या शरीरातील प्राण शोषून घेईल, एका क्षणात !

सूत्रधार : आत्महत्या किंवा मृत्यू म्हणजे जीवनाचा कायमचा शेवट आणि जन्म म्हणजे सुरुवात, मातेच्या गर्भातून या जमिनीच्या पृष्ठभागावर आलेल्या एका नव्या जीवनाची रुजुवात. परंतु हा प्रवेश एवढा तापदायक नसतो. म्हणजे घेणाऱ्याला तर मुळीच नसतो, कारण त्या जिवाला जाणिवांचे पंख उमललेलेच नसतात. संवेदनांचे अंकुर फुटलेलेच नसतात. बहुधा भवितव्यात येणाऱ्या निरनिराळ्या प्रवेशद्वारांवरील अडथळ्यांच्या अनुभूतीकरताच ते जाणवत नसावेत. शिक्षणाच्या जिन्याच्या एकेका परीक्षा–पायरीवरून पुढं पुढं जाताना अपरिहार्यपणे या प्रवेशद्वारावरील द्वारपालांना सामोरं जाणं भागच पडतं. मॉंटेसरीतून प्राथमिक शाळेत, प्राथमिक शाळेतून माध्यमिक

शाळेत आणि माध्यमिक शाळेतून इंजीनिअरिंग, मेडिकल किंवा महाविद्यालयात जाताना...

[एकजण स्टेजच्या मधोमध उभा. त्याच्या भोवती पाच-सहाजण उभे आहेत.]

पहिला : बाळ, तुझं नाव काय ?
विद्यार्थी : धरमेंदर.
१ ला : हं... छान !
२ रा : बाळ, दूध कोणं देत ?
विद्यार्थी : भैया...
३ रा : दहा गुणिले दहा किती ?
विद्यार्थी : शंभर...
४ था : तुम्हांला आमच्याच कॉलेजात ॲडमिशन का घ्यावीशी वाटते ?
विद्यार्थी : कारण गावात एकच कॉलेज आहे, म्हणून.
५ वा : तुम्हांला इंजीनियर का व्हावंसं वाटतं ?
विद्यार्थी : मला नाही वाटत. माझ्या वडिलांना वाटतं, की मी इंजीनियर व्हावं.
५ वा : मग तुम्हांला काय व्हावंसं वाटतं ?
विद्यार्थी : माणूस !
५ वा : इंजीनियर हा माणूस नसतो का ?
विद्यार्थी : मला अनुभव नाही, बहुधा असावा.
५ वा : कॉलेज-फी किती आहे, माहीत आहे ?
विद्यार्थी : हं... अकराशे रुपये.
५ वा : तुमचे वडील काय करतात ?
विद्यार्थी : मी पाहतोय्, तेव्हापासून कारकुनीच करताहेत.
५ वा : ठीक आहे. तुम्ही जा आता —
६ वा : तुम्हांला एमबीएला ॲडमिशन का घ्यावीशी वाटते ?
विद्यार्थी : मला मुळीच वाटत नाही.
६ वा : व्हॉट ?

विद्यार्थी : वसंतदादा कुठे एमबीए होते ! तरी त्यांनी किती तरी कारखान्यांचं व्यवस्थापन केलंच ना ?

६ वा : गेट आऊट !

७ वा : किती टक्के मार्कस् आहेत तुम्हांला ?

विद्यार्थी : ७९ पॉईन्ट ४%

७ वा : ८० टक्क्यांना मेडिकल ॲडमिशन क्लोज होत असते, हे माहीतेय् ना तुम्हांला ?

विद्यार्थी : होय.

७ वा : मग तरीही तुम्ही अर्ज केलात ?

विद्यार्थी : होय.

[ तेवढ्यात फोनची बेल वाजते. ]

७ वा : ( रिसीव्हर उचलून ) हॅलो, मी तर्खडकर बोल्तोय् ? कोण ?

[ कोपऱ्यातून एकजण फोन लावतोय्. ७ वा हा फोन उचल्तो. ]

७ वा : कोण ?

: मी दादासाहेब बोल्तोय्.

६ वा : हां...हां बोला, साहेब, काय सेवा करू ?

दादासो. : कुठपर्यंत आलंय् इंटरव्ह्यूचं काम ?

तर्खडकर : चाललंय् , साहेब...

दादासो. : किती टक्यांना क्लोज होताहेत ॲडमिशन ?

६ वा : ८१ टक्क्यांना होतील, साहेब ! पण तुम्ही काळजी करू नका.

दादासो. : कसली ?

७ वा : नाही...मला समजलंय् , आपले चिरंजीव...संजयलासुद्धा ॲडमिशन हवी आहे, म्हणून.

दादासो. : ठीक आहे, पण त्याला तर मार्क्स् फक्त ७९.२ आहेत आणि ॲडमिशन तर ८१ टक्क्यांना क्लोज होताहेत.

७ वा : पण, साहेब, आपण वरचा एखादा नंबर गाळून तिथं अॅडजस्ट करून टाकू.

दादासो. : तखंडकर, तसा उत्साहीपणा दाखवू नका. तुम्ही असं केलं, तर उद्या मला विधानसभेत विरोधी पक्ष फाडून खातील.

७ वा : मग, साहेब ?

दादासो. : आता आपल्याकडे एकच बॅच आहे ना ? चाळीस जणांची ?

७ वा : अ...होय, साहेब.

दादासो. : मग परवा मी विधानसभेत तीच बॅच साठ जणांची करून घेतो. नाहीतर चाळीस जणांची आणखीन एक बॅच वाढवून घेतो. अं...

७ वा : अं...ठीक आहे, साहेब !

विद्यार्थी : हा दाह आता अनावर होतोय्. संवेदनांच्या पलीकडे पोहोचत जाणाऱ्या वेदना, साऱ्या शरीरभर पसरत चालल्या आहेत. कोणी तरी कंठातून प्राणच शोषून घेत आहे, सहस्र छड्यांचा आघात साऱ्या शरीरावर होत आहे. मऊशार कापसावर लोहाच्या तारांचे व्हावेत, तसे.

[ आजूबाजूचे सहा-सात जण त्याला घेरतात आणि 'छडी लागे छमछम, विद्या येई घम् घम्' म्हणत त्याच्या भोवती गोल गोल फिरतात. तो आतमध्ये तडफडतोय्, 'त्रास !' ओरडतो.

तो तडफडत तडफडत खाली कोसळतो. त्याला सर्वजण कोपऱ्यात टेबलावर बेडकाप्रमाणे ठेवतात. (फ्रॉग डिसेक्शन ग्रूप) ह्याच वेळी दुसऱ्या कोपऱ्यात शिक्षण सुधार समितीचे सदस्य बसलेले दिसतात. ]

: फ्रॉग –डिसेक्शन ग्रूप...

डेमॉन्स्ट्रेटर : फायलम

इतर : कॉरडेटा

डेमॉन्स्ट्रेटर : सबफायलम

इतर : व्हर्टिब्रिटा
डेमॉन्स्ट्रेटर : क्लास
इतर : ॲाफिबिया
डेमॉन्स्ट्रेटर : ऑर्डर
इतर : अन्यूरा
डेमॉन्स्ट्रेटर : फॅमिली
इतर : रॅनिडिया
डेमॉन्स्ट्रेटर : जीनस्
इतर : राना
डेमॉन्स्ट्रेटर : स्पेसीस्
इतर : टायग्रिना

शिक्षण ग्रूप : १

: डियर फ्रेंडस्. आपला देश दिवसेंदिवस प्रगतीच्या एकेक पायऱ्या चढू लागला आहे. जगातील एकूण विकसनशील देशांमधे आपल्या देशाचं स्थान अव्वल आहे. ज्ञान आणि विज्ञानाच्या कक्षा दिवसेंदिवस विस्तारित होत आहेत, आणि या विस्ताराशी समन्वय साधण्यासाठी आपणां सर्वांची शिक्षण सुधार समितीवर नियुक्ती करण्यात आलेली आहे. तेव्हा नव्या पिढीतील विद्यार्थ्यांच्या उद्धाराकरिता आणि विकासाकरिता शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल करावा, असं जगातील इतर देशांच्या तुलनेत अभिप्रेत आहे, त्याकरिता आपल्याला काही प्रयोग करावे लागतील.

फ्रॉग्ज ग्रूप–

डेमॉन्स्ट्रेटर : हाऊ टु ओपन द फ्रॉग ? बी केअरफुल, कीप द अनेस्थेस्टाईज्ड् फ्रॉग अपसाईड डाऊन ऑन द डिसेक्टिंग प्लेट...टाय द फ्रॉग टु द डिसेक्टिंग प्लेट बाय् पुटिंग नॉटस् ऑन द रिस्ट ॲन्ड नीज जॉईंटस्...द ॲनिमल, व्हेन टाईड, शुड बी वेल स्ट्रेच्ड...लेट् द अनिमल बी इमर्स्ड् इन वॉटर.

शिक्षण ग्रूप : १

: परंतु, सर, त्याकरिता विद्यार्थ्यांची मानसिक तयारी असणे आवश्यक आहे.

डायरेक्टर : त्याची काही आवश्यकता नाही. पाण्यात पडलेला आपोआप हातपाय मारतो. आपल्याला शिक्षण-पद्धतीच्या पायाची रचना अशी करायची आहे, की जेणेकरून विद्यार्थी स्वतःच्या पायांवर उभा राहील.

फ्रॉग्ज ग्रूप—

डेमॉन्स्ट्रेटर : कॅच होल्ड ऑफ द ॲब्डॉमिनल स्किन ॲड मेक अ स्लिट...कट् द बॉडी वॉल आयदर साईड ऑफ द इंटेरीअर ॲब्डोमिनल व्हेन ॲड कट् द फूट.

शिक्षण ग्रूप : १

: आपल्याला विद्यार्थ्यांच्या हृदयात साठलेल्या अंधाराच्या भिंती पाडायच्या आहेत.

फ्रॉग्ज ग्रुप—

डेमॉन्स्ट्रेटर : रिमूव्ह द पेरिकर्डिअम ॲड एक्स्पोज द हार्ट... नोट द ट्रॅंग्यूलर, मस्क्युलर, व्हेन्टरीकल, अ थिन वॉल्ड ॲड डार्क रेड ऑरिकल्स्... टॅक ॲड रिमूव्ह द प्रिकॅव्हल्स्...

शिक्षण ग्रूप : १

: प्रत्येक विद्यार्थ्याचा बुद्ध्यांक इतका वाढवायचा, की त्यांच्या डोळ्यांवरील झापडं दूर व्हायला पाहिजेत. आणि त्याच्या मेंदूमधे नवीन तिसरा डोळा जन्माला यायला पाहिजे. त्यांच्या नसानसांत,पेशीपेशींत ज्ञानाचे दरवाजे उघडले पाहिजेत.

फ्रॉग्ज् ग्रूप—

डेमॉन्स्ट्रेटर : रिमूव्ह द स्किन फ्रॉम डॉरसुल साईड...रिमूव्ह द आईज् बाय पुशिंग

द आय्–ब्रॉल्स् अप फ्रॉम द व्हेन्ट्रल साईड ॲन्ड कटिंग द ऑप्टिक नर्व्हस् ॲंड मसल्स् ॲंड फाईंड द ब्रेन...

शिक्षण ग्रूप : १

: विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि वंदिस्त भवितव्यासाठी हे प्रयोग अतिशय महत्त्वाचे आहेत.

फ्रॉग्ज् ग्रूप–
डेमॉन्स्ट्रेटर : ॲंड हेन्स द फ्रॉग इज ओपन, विथ ऑल एक्स्पोज्ड चेंबर्स.

शिक्षण ग्रूप : १

: मागच्या सर्व योजना जरी अयशस्वी ठरल्या असल्या, तरीही आपण आता नवीन योजनांच्या बाबतीत विचार करू या. एवढं मात्र निश्चित, की ह्या योजनांचे इम्प्लीमेंटेशन मात्र सुरक्षित आणि प्रामाणिकपणे व्हायला हवं.

[ अगदी सुरुवातीचे संवाद : फायलम्–कॉरडेटा, इ. कोरसमधे रिपीट होवात.
स्टेजवर ११ + ४=१५, १० + २ + ३ = १५,
९ + ४ + २=१५.असं म्हणत सर्वजण सैरावैरा फिरत आहेत. ]

एकजण : ए, आज कसलं ट्युटोरिअल आहे ?
दुसरा : च्यायला, एवढी कशाला काळजी करतोस ? म्हणजे मला पण माहिती नाही, पण परीक्षेअगोदर पंधरा दिवस गठ्ठ्यानं देऊन टाकू ट्युटोरिअल्स्.
तिसरा : काय म्हणतोस ?
चौथा : अरे, मग खोटं वाटतं होय ? आपल्या इंग्लिशचा घोरपडे मास्तर मेनरोडवर ट्युटोरिअल शीट्स् वाटतो.
पाचवा : अरे, हे काही नाही. मराठीच्या खरेबाई, घरी गेलं, तरी ट्युटोरिअलं

शीट तर देतातच; पण वर चहाही पाजतात.

६ वा : बरोबरच आहे.

७ वा : काय ?

८ वा : अरे, अजून अनमॅरिड् आहे ना ती.

[ हास्यकल्लोळ. ]

एकजण : अरे, पटवर्धनमास्तर इकडे येतोय्. पुढच्या आठवड्यात सेमिनार घेताहेत, म्हणे, ते.

[ पटवर्धन येतात. ]

सर्वजण : सर, सेमिनार म्हणजे काय, हो ?

एकजण : सर, सेमिनार म्हणजे काय, हो ?

पटवर्धन : सेमिनार म्हणजे तुम्हांला एक प्रश्न दिला जाईल आणि तोही ऑन द स्पॉट ! त्या प्रश्नावर तुम्ही सुमारे पंधरा मिनिटं बोलायला पाहिजे. सेमिनार बोर्डवर असलेले प्राध्यापक आणि विद्वान् . . .

एकजण : ( हळू आवाजात ) म्हणजे प्राध्यापक विद्वान नसतात काय ?

पटवर्धन : तुम्हांला या प्रश्नावर उपप्रश्न विचारतील. तर तुम्हांला त्याची उत्तरं द्यावी लागतील.

एकजण : सर, हे फारच अवघड दिसतंय् , हो !

पटवर्धन : अवघड आहे, पण आवश्यकही आहे.

एकजण : ते कसं ?

पटवर्धन : तुम्ही उद्याचे चांगले नागरिक व्हावेत, म्हणून.

एकजण : डोंबलाचं ! सर, आम्ही उद्याचे फक्त चांगले कारकून होणार आहोत, मग कशासाठी ही झकमारी करायची आणि फुकट वेळ घालवायचा ? त्यापेक्षा पुढच्या आठवड्यात ' मिनर्व्हा 'ला राज-कपूरची सीरिज् लागतेय्. तिलाच रोज बसत जाऊ की आपण.

पटवर्धन : काय म्हणाला ? नाही म्हणजे तुमचंही मला थोडं पटतंय्, पण...

सर्वजण : मग अडतं कुठं ?

पटवर्धन : मग निदान तुम्ही एवढ तरी करा. क्वेश्चन बॅंकमधल्या कोणत्याही एका प्रश्नाचं उत्तर लिहून आणा. सेमिनार कॅन्सल.

एकजण : सर... थॅंक्यू, सर !

पटवर्धन : घ्या, ही शीट्स् घ्या, ह्याच्यावर लिहून आणा.

[ सर्वांना शीट्स् वाटतात. सर्व घेतात. 'क्वेश्चन बॅंक, झिंदाबाद, झिंदाबाद' म्हणतात. स्टिल. ]

एकजण : सर, तुम्ही सेमिनार नाही घेतले. थॅंक्यू! निदान एक चारमिनार तरी घ्या. ( सिगारेट देतो. )

एकजण : क्वेश्चन बॅंकमधल्या कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहून आणा.

सर्वजण : जिंदाबाद...क्वेस्चन बॅंक झिंदाबाद !

दुसरा : ट्युटोरिअल धरून लिहून आणा.

सर्वजण : क्वेशन बॅंक जिंदाबाद !

एकजण : क्वेशन बॅंकच्या बाहेर एकही प्रश्न विचारला जाणार नाही.

सर्वजण : क्वेशन बॅंक जिंदाबाद !

एकजण : आमची प्रकाशने, आर्टस् सायन्स कॉमर्सच्या सर्व सत्रांच्या प्रश्न मंजूषेमधील निवडक महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे ! लेखक– अनुभवी प्राध्यापक...

[ सर्वजण 'क्वेश्चन बॅंक जिंदाबाद...' दोन-तीन वेळा जिंदाबादचे नारे.
पदवीदान समारंभाचे दृश्य– ]

एकजण : रिस्पेक्टेड् मिनिस्टर, आवर चीफ गेस्ट मिस्टर शिंदे, व्हाईस चान्सलर, डीन्स ऑफ द फॅकल्टीज्, माय कलीग्ज् ॲंड स्टुडंटस्...

प्रेक्षकांमधून
आवाज : ओ, मराठीतून बोला, मराठीतून बोला !

एकजण : ऑल राईट. आपल्या विद्यापीठाच्या १९७९–८० च्या शैक्षणिक वर्षातील पदवीदान–समारंभासाठी आपण सर्व जमलो आहोत. काही अपरिहार्य कारणामुळे ह्यावेळी निकालांना अक्षम्य वेळ झाला, हे जरी खरे असले, तरीही एक प्रकारे विद्यापीठाने तीन महिने उशिरा निकाल लावून विद्यार्थ्यांवर उपकारच केलेले आहेत. ते म्हणजे असे, की तीन महिने उशिरा पदवी मिळाल्यामुळे ते तीन महिने उशिराच बेकार झाले.

[ तो हसतो. तसे इतरही हसतात. स्टिल.]
सर्वजण 'वाँटेड, चाहिये, पाहिजे' असं म्हणत फिरताहेत ]

: नवीन नावे नोंदविणाऱ्या उमेदवारांनी येथे क्यू करावा.
: कॉल आलेल्यांनी येथे क्यू करावा.
: एम्प्लॉयमेंट एक्सचेंजमधील असे सर्व बोर्डस्...
: क्यूतल्या प्रत्येक उमेदवाराकडे पाहून कुत्सितपणे हसत असतात.
: आणि म्हणत असतात...
: हसा, खदखदून हसा !
: तो पिवळा शर्टवाला दिसतोय् ना ?
: तो येथे रोज येत असतो.
: आशाळभूतपणे फिरत असतो.
: त्याच्या शर्टावरची भोकं...
: हा सारा खेळ मजेनं पाहत असतात.
: पण त्यानं त्याच्याकडे कधी पाहिलंच नसतं.
: प्यून्स, कारकून, ऑफिसर्स...कुत्र्यांकडे पाहावं, तसं पाहत असतात.
: क्वचित एखादा सिंपथेटिक बोलतो.
: कॉल आलेल्या उमेदवारांकडे पाहून साहेब म्हणत असतात...
: तुम्ही येथे येताना तुमच्या पायांनी आलात. जाताना मात्र आमच्या पायांनी जावं लागेल.
: सर्व आटोपते.

: नीरव शांतता पसरते.

: स्मशानशांतता.

: सर्व आपल्या पायांकडे पाहतात.

: पांगळ्या नजरेने.

: तो पिवळा मुडदा तहानलेल्या नजरेने पाठच्या विहिरीकडे वळतो.

: विहिरीवरचा बोर्ड वाकुल्या दाखवत असतो.

: धोका... धोका... धोका.

: त्याला साहेबांचे वाक्य पुन्हा आठवते.

: तुम्ही येथे येताना तुमच्या पायांनी आलात. जाताना मात्र आमच्या पायांनी जावे लागेल.

: त्याला कावीळ झाल्यासारखे वाटते.

: शर्टच शर्ट...पिवळेच पिवळे.

: त्याचा नंबर शेवटचा असतो.

: तो त्याच्या पायांकडे पाहतो.

: पांगळे पाय, कुबड्या घेतलेले पाय, चार पाय.

: नुकत्याच विहिरीतून बाहेर आलेल्या बेडकांच्या डोळ्यांत त्याला त्याच्या पायांचे प्रतिबिंब दिसते.

कोरस : चार पाय ! चार पाय ! ! चार पाय ! ! !

[ इन्टरव्ह्यूचे दृश्य.]

अधिकारी : तर तुम्ही बी. ई. झाला आहात...

उमेदवार : यस, सर !

अधिकारी : कधी झालात ?

उमेदवार : १९७६ मध्ये, सर.

अधिकारी : मग तीन वर्षे काय केलं ?

उमेदवार : देशाच्या साऱ्या कोनाकोपऱ्यांत हिंडलो, साहेब, नोकरीसाठी.

अधिकारी : मग ?

उमेदवार : सगळीकडे 'नो व्हेकन्सी,' सर !

अधिकारी : पण आमच्याकडे व्हेकन्सी नाहीहेत.
उमेदवार : कुठलंही काम द्या, साहेब. फिटर, टर्नर, पण मला काम द्या, साहेब.
अधिकारी : ओ. के. आमच्याकडे टर्नरची एक जागा शिल्लक आहे.
उमेदवार : थँक्यू, सर. (जातो.)

[ दुसरा येतो. ]

अधिकारी : काय शिकलात तुम्ही ?
दुसरा उमे० : आय्. टी. आय्. झालोय्, साहेब.
अधिकारी : कोणता कोर्स ?
उमेदवार : टर्नर.
अधिकारी : पण ती जागा आम्ही एवढ्यात भरली.
उमेदवार : कोणतंही काम द्या, साहेब, पण मला काम द्या.
अधिकारी : आमच्याकडे एक स्वीपरची जागा आहे.
उमेदवार : थँक्यू, सर. ( जातो. )

[ तिसरा येतो. ]

३ रा : सायब, मला झाडूकाम पाहिजे. आपल्याकडे एक जागा शिल्लक हाय, म्हणे !
अधिकारी : गेट आऊट !

[ दुसऱ्या इन्टरव्ह्यूचे दृश्य — तीन जण प्रवेशतात. ]

अधिकारी : यस, कम् इन, सिट डाऊन प्लीज्. तुमची क्वालिफिकेशन्स् काय ?
१ ला : बी. ए. विथ इंग्रजी, सर.
२ रा : बी. कॉम्, सर.
३ रा : बी. एस्सी. वीथ फिजिक्स, सर.
अधिकारी : तर मी आपल्या तिघांची सामुदायिक परीक्षा घेतो. आपण उत्तर द्या.

(बी. ए. विथ इंग्लीशवाल्यास.) देशाचे आर्थिक चलन कशावर अवलंबून असते ?

[तो गप्प.]

२ रा : आय् कॅन टेल, सर.
अधिकारी : मी तुम्हांला ज्या प्रश्नाचे उत्तर विचारीन, त्याचे उत्तर द्या.
२ रा : येस, सर.
अधिकारी : आइनस्टाइनचा ॲटमविषयक सिद्धांत काय आहे ?
३ रा : मे आय् टेल, सर ?
अधिकारी : कीप मम् ! तुम्हांलाही विचारतोच, शेक्सपीयरने किती नाटके लिहिली?

[तिसरा गप्प.]

१ ला : आय् एम टेलिंग, सर.
अधिकारी : डोन्ट टेल ! (गडगडत हसतो). मी तुम्हांला तीन प्रश्न विचारलेत. पण ह्या तीनही प्रश्नाची उत्तरे तुम्ही देऊ शकला नाही. पण तरीही ह्या तिन्ही प्रश्नांची उत्तरे तुमच्यापैकी प्रत्येकाला माहीत आहेत. (पहिल्याला उद्देशून) तुमच्या दृष्टीने आर्थिक चलनाचा प्रश्न, तर (दुसऱ्यास) तुमच्या दृष्टीने आइनस्टाइनच्या ॲटमच्या सिद्धांताचा प्रश्न, आणि तुमच्या दृष्टीने (तिसऱ्यास) शेक्सपीयरने किती नाटके लिहिली, हा प्रश्न जनरल नॉलेजचा झाला. तुम्ही तिघंही टेस्टमध्ये फेल झाला आहात. बट डोन्ट वरी, बॉईज्, तुमचं सिलेक्शन केलंय्, असं मी जाहीर करतो, कारण तुम्हांला जे काम देण्यात येणार आहे, त्या कामात ह्या तीनही प्रश्नांच्या उत्तरांचा कोणताही संबंध नाही.

[स्टेजवर सात-आठ जण बसलेले असून कोणी लिहीत आहे. कोणी टायपिंग करतोय्, इत्यादी.]

एकजण : हा अरुण रामचंद्र शेवाळकर एम. ए. विथ मराठी, फर्स्ट क्लास, पण आता ह्या टेबलावर बसून तो एका सहकारी बँकेच्या थकबाकी-दारांच्या नावांची यादी तयार करतोय्. तर हा अशोक शंकर भडे बी. कॉम्. विथ फर्स्टक्लास. तो पोस्टातल्या खुर्चीत बसून पोस्ट कार्डस्, पाकिटे आणि तिकिटे विकतोय्. आणि ही रेणुका गंगाधर गोखले, बी. एस्सी. विथ केमिस्ट्री डिस्टिंक्शन. ती एका राष्ट्रीकृत बँकेच्या काऊन्टरवर बसून पासबुक भरून राहिलीय्. हे हे सगळे असेच आणि तो फूटपाथवर दिसतोय् ना काही तरी विकून राहिलाय् ? तो गजानन शंकर भागवत एस्.एस्.सी.ला माझ्या बरोबरच होता. संस्कृतचं शंकरशेट पारितोषिकही त्यानं घेतलं होतं म्हणतात.

[ 'या कुन्देन्दु तुषार हार धवला' ही प्रार्थना कोरसमध्ये म्हणतात.

विधानसभेचे दृश्य.

सत्तारूढ व विरोधी पक्ष वेगवेगळ्या बाजूला बसलेले आहेत. ]

एकजण : सभापती ह्या नात्याने मी आजच्या अधिवेशनाचे काम सुरु करतो. आजची ही आपली शेवटचीच सभा आहे. कारण ह्यानंतर लवकरच निवडणुका होणार आहेत. असो. मुद्द्यांच्या यादीनुसार शिक्षणमंत्र्यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी, असे सुचवितो.

शिक्षणमंत्री : युवकांच्या कल्याणाकरिता काही विधायक योजना मी आपल्यासमोर मांडीत आहे. ( पुढे फक्त 'मायमिंग' करतोय् )

[ थोड्या वेळाने विरोधी पक्षाचे सदस्य 'नाही ना, नाही ना,' म्हणतात व सत्तारूढ पक्षातले 'होय ना, होय ना.' असे म्हणतात गोंधळ वाढत जातो. ]

सभापती : शांत व्हा ! एकूण सदस्यांच्या कौलानुसार व आवाजी मतदानानुसार मी सभापती ह्या नात्याने असे जाहीर करतो, की शिक्षण–मंत्र्यांनी मांडलेल्या सर्व योजना ह्या सभागृहाने स्वीकृत केलेल्या आहेत.

[ " युवकांच्या कल्याणासाठी आमचा पक्ष ", " युवकांच्या विकासासाठी आमचा पक्ष " ," युवकांचा, पक्ष आमचा पक्ष, " युवकांसाठी आमचा पक्ष, " " युवकांचा पक्ष, आमचा पक्ष, " अशा घोषणा होतात.

मतदानाचे दृश्य : मतदान आटोपते

परत विधान सभेचे दृश्य. सत्तारूढ पक्ष होता, तो विरोधी झाला असून विरोधी पक्ष सत्तारूढ झालेला आहे. ]

सभापती : ह्या नव्या राजवटीचा सभापती ह्या नात्याने मी शिक्षण–मंत्र्यांना भाषण करण्याचे सुचवितो.

[ कोपऱ्यात चार-पाच जण चर्चा चालल्याचे मायमिंग चर्चा करीत आहेत.]

शिक्षणमंत्री : मागील सरकारने युवकांच्या कल्याणाच्या नावाखाली निवडणुकीत भांडवल करण्यासाठी काही योजना पास केल्या होत्या. या योजनांवर सरकारी अधिकारी, प्रतिष्ठित नागरिक व तज्ज्ञांच्या समितीने सखोल विचार करून सदर योजना ह्या युवकांच्या कल्याणाच्या दृष्टीने उपयुक्त नाहीत, असा निर्वाळा दिलेला आहे. म्हणून सदर योजना आम्ही रद्द करीत आहोत.

[ ' होय बा... ' ' नाही बा... ' चा गोंधळ ]

सभापती : शिक्षण-मंत्र्यांची सुचना सभागृहाने स्वीकारली, असे मी जाहीर करतो.

[ कोपऱ्यातील पाच सहा-जण मायमिंग करताना गुडघ्यावर बेडका-सारखे पडतात. ]

एकजण : बेडकं...ही आहेत फक्त बेडकं. ह्यांचे देह आहेत तुमच्या प्रयोगां-करिता. विहिरीत राहणाऱ्या बेडकाला वाटत असतं, जग फक्त तेवढंच आहे. ह्या विहिरीच्या पलीकडे जग नाही. सॉयकॉलॉजिकल ॲनलिसिस्‌च्या नावाखाली तुम्ही करा यांचे विच्छेदन. यांच्या हृदयाच्या स्पंदनाची करा मोजदाद प्रत्येक क्षणाला, पण शपथ सरस्वतीची; विचार करू नका तुम्ही काय जाणवेल यांच्या मनाला. बनवा तुमच्या महत्त्वाकांक्षेची ह्यांना शिडी, ही उद्याची पिढी, की मढी? ह्या बेडकांना तुम्ही पाण्यात सोडा, नाहीतर जमिनीच्या पृष्ठभागावर सोडा. ते दोन्हीही ठिकाणी श्वास घेऊ शकतात, हे माहीतेय्‌ तुम्हांला. पण... ह्यांच्या श्वासांची फुलं कधी होणार?

[ ह्याच वेळी कोपऱ्यात सर्वजण—' फायलम्‌—कोरडेटा, सबफायलम्‌—व्हर्टिब्रटा ' इत्यादी शब्द म्हणत असतात. ]

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. 20488 नों. दि. 2/99/07
वि. ..... क्र. .....

# कधीही न संपणारं नाटक

[ रंगमंचावर फक्त दोन तरुण, एक सुशिक्षित दिसतोय् ( मास्तर ). दुसरा खेडवळ ( राम्या ).

राम्या : शहरातील लोकांना पाऊस नकोसाच वाटतो. कारण पावसानं चिखल हुतो. पण ह्याच चिखलात बैल आणि शेतकरी राबून तुमच्या–आमच्या पोटाची व्यवस्था करतात. मास्तर, पावसाळ्यात आभाळात सरसरत येणारे ढग-पाहिले, की आमच्या मनाचा मोर पिसारा फुलवतो, पावसाळ्यात सूर्याचं त्वांड दिसलं, की लगीन न करता पडलेल्या कुमारिकेचं त्वांड पाहिल्यासारखं वाटतं. ( पॉज ) मास्तर, तुम्हांला नाटक लिवायचंय् ना ? मग लिवा नाटक. त्ये पाहा आभाळात पसरलेले ढगांचे मुर्दाड हत्ती ! त्यांच्यावर लिहा नाटक.

[ तेवढ्यात ऑडियन्समधून काही पुरुष धोंड्याचे पारंपरिक गीत म्हणत रंगमंचावरून विंगेत जातात. ]

राम्या : मास्तर, याही वर्षी पाऊस पडला नाही, पडणार नाही ! मास्तर, याही वर्षी गावातल्या तरण्याताठ्या पोरी उजवणार नाहीत ! मास्तर, याही वर्षी ह्या गावातनं तुमच्या शहरातल्या रांडांच्या गल्लीत काही पोरी धंद्याला लागणार !

[ पार्श्वभागी ‘ धोंड्या, धोंड्या, पाणी दे ’ हे शब्द दुरून जवळ जवळ येतात. ह्याच वेळी वेगवेगळ्या विंगांमधून काही स्त्री, पुरुष सरपटत, तडफडत येतात. सर्व स्टेजच्या मध्यभागी येतात, ‘ धोंड्या,

थोंड्या, पाणी दे ' हे शब्द जेव्हा टिपेला लागतात, त्याच वेळी एकजण दवंडी पिटत येतो. ]

दवंडीवाला : बंधू आणि भगिनींनो, ऐका, हो, ऐका ! आज रात्रीला नवाच्या ठोक्याला बिर्डिंगच्या बाजूला रावसायबांची सबा होणार हाय, हो...

[ सभेचे दृश्य, रंगमंचावरची पात्रे सभास्थानी बसतात. कोपऱ्यात उंचभागी असलेल्या खुर्च्या रिकाम्या दिसतात.

रावसाहेब थोड्या वेळाने कोपऱ्यातून येतात. ते येण्यापूर्वी ' रावसायब आले. रावसाहेब आलेत ' गलका होतो. आल्यावर सर्वजण हात जोडून उभे राहतात. रावसाहेब ' बसा ' अशी हाताने खूण करतात. सर्वजण बसतात.
तेवढ्यात ' नेताजी बी आले' असा गलका होतो. नेताजी प्रवेशतात.]

रावसो. : या, या, नेताजी, बसा.

[ नेताजी खुर्चीवर बसू लागतात, रावसाहेब हाताने लोकांमध्ये बसा. अशी खूण मिस्किल हास्य करीत करतात. नेताजी बसतात. रावसाहेब बोलावयास सुरुवात करतात. ]

रावसाहेब : माझ्या बंधूंनो, भगिनींनो, आणि मुला–मुलींनो, मी इथं आज तुम्हांला मुद्दामहून बोलावलंय्, तुमची गाऱ्हाणी आणि मागण्या ऐकण्यासाठी.

[ सभेतून एकजण कुजबुजतो : ' काय, रं, डिग्या, विलेक्शन जवळ आली वाटतं ? ' ]

रावसाहेब : ह्या वर्सी बी पावसानं झुकांडी मारली. गावची परिस्थिती मला ठाऊक

हाय. दुष्काळानं ह्या वर्सी बी जमीन सुकलेली हाय. मी परवाच्याच दिवशी कलेक्टरसायबांना भेटून आलो. त्यांना सारी परिस्थिती समजावून सांगितली. गावामधी मागील वर्षीप्रमाणं रोजगार हमी योजना सुरू होणार हाय. परत्येकाला मागील वर्षीप्रमाणंच पैसे मिळतील.

[ नेताजी मध्येच उभे राहतात. ]

नेताजी : रावसाहेब, मागील वर्षी स्वस्ताई होती. या वर्षी परिस्थिती तशी नाही. साखर, रॉकेल, धान्य... साऱ्यांचेच भाव दुपटी-तिपटीनं झालेले आहेत, तेव्हा या वेळी पैसे जास्त मिळाले पाहिजेत.

रावसाहेब : नेताजी, तुमचं म्हणणं बरूबर हाय. मलाबी तसंच वाटतं. मी कलेक्टरसायबांनाही सांगितलं, पण त्ये म्हणाले, वरून आदेश मिळाला, तरच हे शक्य हाय. आपण तरी करणार काय ? जे मिळालं, ते तरी कशापायी सोडायचं ? काय, जाधवराव, पांडूतात्या ? काय, गंगूबाई ?

गंगूबाई : रावसाहेब, तुमचं म्हणणं कधी चूक आसतं का ? तुमी कराल, त्ये ठीकच कराल. ( नेताजींना रावसाहेब खाली बसायची खूण करतात. नेताजी खाली बसतात. ) पण, रावसायब, या दुष्काळापायी चार वर्सं झाली, गावातल्या तरण्याताठ्या पोरींची लग्नं झाली न्हाईत. हये वर्सं ग्येलं, तर त्या पोरी उजवायच्या कोणी ?

रावसो. : गंगूबाई, गावातल्या मुली मला माझ्या मुलीसारख्याच हायेत. गंगूबाई तुझी सावित्री लग्नाची झाली असेल, नाही ?

गंगूबाई : व्हय, रावसायब !

रावसो. : मी मागच्या हप्त्यात मुंबयला व्हतो. त्येच तुमाला सांगण्यासाठी हिथं मी बोलावलंय्. आपल्या गावामंदी या वर्सी सामुदायिक विवाह करायचं ठरवलंय् मी. मुंबय्ला सात दिवस वणवण फिरून दहा शिकलीसवरलेली पोरं मी तयार केली हायेत. कुणी बँकेत हाये, तर कोणी सचिवालयात हाये. कारकून हायेत आणि दोन तर हापिसर बी हायेत.

एकजण : पण, रावसायब, लगनासाठी पैका कुठून आनायचा ? आम्हां गरिबां-कडं तर येक कवडी न्हाई. आणि ही शहरातली श्यानी सवरलेली पोरं तर हजार हजार रुपये हुंडा मागत्यात.

रावसाहेब : न्हाई, धोंडीबा, त्येची काळजी करू नका. आता हुंडा घेणं, देणं, कायद्यानं गुन्हा हाय. ही लग्नं सादी व्हनार. येक पैसा बी खर्च व्हनार नाय, हुंडा बी द्यावा लागनार न्हाय.

एकजण : काय म्हंता, रावसायब ?

रावसाहेब : पण ह्याला तुमची तयारी पाहिजे.

[ रावसाहेबांचा जयजयकार असो. ' रावसाहेब झिंदाबाद ! ' अशा घोषणा होतात. जमाव निघून जातो. रंगमंचावर फक्त नेताजी राहतात आणि कोपऱ्यात कुबड्या हातांत असलेला एक खेडवळ ( राम्या ).]

नेताजी : करा जयजयकार ! आगदी नरडं फुटेस्तोवर करा. सामुदायिक विवाह, म्हणे. हुंडा द्यावा लागणार नाही आणि एक कवडी खर्च होणार नाही, म्हणे. इलेक्शनला अजून सहा महिने आहेत, रावसाहेब. परिस्थिती केव्हा उलटी होईल, ते कळणार पण नाही. ( झटकन् निघून जातो. )

राम्या : हा दुसरा चोर, मास्तर, भुकेनं बळी पडलेल्या मुडद्यांवर दुष्काळात गिधाडं घिरट्या घालतात. आमच्या गावात दोन गिधाडं हायेत. एक रावसाहेब दुसरं नेताजी.

[पार्श्वभागी पिपाण्या, ढोल ह्यांचे आवाज, 'या, हो, दांड्यावरून नवरा कुणाचा येतो,' च्या तालावर. सायक्लोरामावर मिरवणूक जाताना दिसते. पिपाण्या, ढोल ह्यांचे आवाज दूर जातात, तसे रंगमंचावरचे दिवे प्रखर होत जातात. रंगमंचावर गंगूबाई, नवरीच्या रूपातली सावित्री आणि तिचा नवरा दिसत आहेत. सावित्री व तिचा नवरा दोघे वाकून गंगूबाईला नमस्कार करतात ]

गंगूबाई : (त्यांना उठवत) सुखात राहा. सायब...

सावित्रीचा नवरा : आई, मी तुमच्या मुलासारखा, साहेब कशाला म्हणता मला ?

गंगूबाई : तसं न्हाई, जावईबापू, पण तुमी हापिसर हात, म्हणून !

सावित्रीचा नवरा : ऑफिसर असेन मी मुंबईत, इथं नाही.

[तेवढ्यात आणखी एक नवविवाहित जोडपं (राधा व तिचानवरा) व सखूबाई प्रवेशतात. ते दोघे गंगूबाईला नमस्कार करतात.]

गंगूबाई : सुखी व्हा. राधे, नीट राहा, बाई. पती हा परमेश्वर असतू, त्याची सेवा करा. बाईचा हाच धर्म हाये.

सावित्रीचा नवरा : बरं, आई, चलतो.

गंगूबाई : चलतू नाही, येतो म्हणा. गणेस चतुर्थीला या, म्हणलं. (कोपऱ्यातून एक गाठोडं आणून त्याच्या हातात देते.) घ्या हो. (सावित्रीचा नवरा ते गाठोडं सोडून पाहतो.)

सावित्रीचा नवरा : हे काय ?

गंगूबाई : व्हय, तीन सेर हाये, तुमच्या साठीच हाये.

सावित्रीचा नवरा : नाही, आई, हुंडा घेणं गुन्हा आहे. तुम्ही तुमची सोज्ज्वळ मुलगी दिली, तेच खूप झालं.

गंगूबाई : न्हाई, जावईबापू, न्हाई म्हणू नका. तुमी न्हाई घेतलं, तर मला बरं न्हाई वाटणार.

सावित्रीचा नवरा : ठीक आहे. तुमची इच्छा.

[दोन्ही जोडपी जाऊ लागतात.]

गंगूबाई : जावईबापू, आमच्या पोरींना सांभाळून घ्या. शिकलेल्या न्हाईत त्या, काही चूकचीक झाली, तर पोटात घालून घ्या. सावित्री, राधे, काळीज नुसतं तटातटा तुटतंय्, ग. तुम्हांला वाढवलं, खाऊ–पिऊ घातलं, आन् आता तुमी चालल्या...

[ राधा सखूबाईच्या खांद्यावर, तर सावित्री गंगूबाईच्या मिठीत शिरून रडू लागतात. ]

गंगूबाई : रडू नका, पोरींनो, तुमचं नशीब थोर, म्हून ह्ये राजपुत्र मिळाले तुमाला.

सखूबाई : रावसाहेबांमुळं झालं ह्ये. देवमाणूस हाये. बिचाऱ्यांचं भलं होवो. माझंबी आयुष्य मिळो त्येला.

[ पार्श्वभागी पारंपरिक गीत कोरसमध्ये सुरू आहे. सावित्री, राधा, निघून जातात. सायक्लोरामावर एक डोली चाललेली दिसत आहे.

नेताजींचे घर. नेताजी खाटेवरून एकदम ओरडून जागे होतात. त्यांचा श्वासोच्छ्वास जोरात सुरू आहे. त्यांची बायकोही त्यांच्या जवळ आहे. ]

नेताजी : नाही, मी हरलेलो नाही.

बायको : काय झालं ? काही वाईट साईट सपान पडलं का ?

नेताजी : तू वेडी आहेस, सगुणा ! झोप लागेल, तर स्वप्न पडतं.

बायको : एक महिना झाला, मी पाहतीये. तुमच्या डोळ्याला डोळा लागत नाहीये.

नेताजी : कसा लागेल, बाई ? निवडणूक जवळ जवळ येत चालली आहे. रावसाहेबाचा प्रभाव काही कमी होत नाहीये. सामुदायिक लग्नं लावल्यापासून तर पंचक्रोशीत त्याचं नाव झालं.

बायको : लोक तर त्यांना देवमाणूस म्हणतात. दुसरा महात्मा गांधी म्हणतात.

नेताजी : ( एकदम भडकून ) तू पण म्हण ना. म्हण ! इतकी कशी, ग, तू अडाणी ! उद्या मी मंत्री झालो, तर कशी तू मंत्रीणबाई म्हणून शोभशील.

बायको : ( लाजत ) शोभेन, शोभेन ! का न्हाई शोभणार ?

नेताजी : ( संतापून ) शोभेन, शोभेन, म्हणे ! इथं सरपंच व्हायची मारामार आणि मंत्रीण व्हायची स्वप्नं पाहते.

बायको : तुमी कशापायी जिवाला त्रास करून घेता ?

नेताजी : अग, मग मंत्री काय खाटेवर तुझ्या शेजारी झोपून होणार आहे का ?

बायको : इ स...!

नेताजी : इस काय ? त्यासाठी प्रयत्नच करावे लागतात. कठीण प्रयत्न, प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे... ऑ... प्रयत्ने वाळूचे कण... वाळूचे कण... रगडिता... तेल... ही गळे... तेल... वाळूचे कण... वाळूचे कण... तेल...

बायको : काय झालं, धनी ?

नेताजी : ह्या दगड्याविरुद्ध नवीन पॉईंट सापडला.

बायको : दगड्या कोण ?

नेताजी : अग, तोच देवमाणूस, दुसरा आधुनिक महात्मा गांधी !

[ उशाखाली काहीतरी चाचपडू लागतो. ]

नेताजी : माझी डायरी कुठेय् ?

[ बायको तिच्या उशाखालून काढून देते. ]

नेताजी : तुझ्या उशाखाली कशी गेली ?

बायको : इस... !

नेताजी : ( डायरीत टिपत ) प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे...

[ बायको कंदील विझवते. अंधार. ]

[ छिन्नी व हातोड्यांचे आवाज होत आहेत. रंगमंचावर सात–अठा पुरुष व हातांत घमेली असलेल्या दोन–तीन स्त्रिया दिसत आहेत. नेताजी त्यांच्यामध्ये आहेत. ]

नेताजी : हे पाहा, तुमच्या लक्षात कसं येत नाही. त्या दगडूला...

एकजण : दगडू ?...

नेताजी : नाही म्हणजे रावसाहेबांना मी चांगला ओळखतो. आता हे मटेरियल पाहा, ह्यात सिमेंट कुठं दिसतच नाही. कारण सिमेंटच्या गोण्या जातात रावसाहेबांच्या घरी.

एकजण : जाऊ द्या की, तुमच्या पोटात कशापायी दुखतंय् ? तुम्हांला बी पाहिजे का, नेताजी ?

नेताजी : तसं नाही. हा शुद्ध भ्रष्टाचार आहे.

दुसरा : काय बी असू द्या. सरकारचं हाय ना ? ते सरकार आणि रावसायब पाहून घेतील.

नेताजी : ठीक आहे. तुम्ही त्यांना निवडून दिलंय् , मी तरी काय बोलू ? पण आता तेलाचं पाहा. सरकारकडून जे तेल मिळतं, त्यातलं अर्धंच तेल गावात पोहोचतं. बाकी परस्पर विकलं जातं. आणि उरलेलं तुम्हांला चारानं जास्त भाव घेऊन दिलं जातं.

एक बाई : नेताजी, काय बी शिंतोडे उडवू नका रावसाहेबांवर.

नेताजी : तसं नाही, ताई, हे जे सगळं चाललंय्– म्हणजे भ्रष्टाचार, दुर्बलांचं शोषण. ते माझ्यासारख्या माणसाच्या मनाला पटत नाही. आता तुम्हांला रोज किती मिळतो ?

दुसरी : पाच रुपये.

नेताजी : हं. आणि तुमचा अंगठा घेतला जातो आठ रुपयांवर ! म्हणजे तीन रुपये जातात रावसाहेबांच्या तिजोरीत.

तिसरी बाई : पण, नेताजी, रावसाहेबांनी सामुदायिक लग्नामंधी सारा खर्च क्येला. त्यासाठीच कापत असतील तीन रुपये. कापले, तर कापले.

नेताजी : नाही, बायजाबाई, सामुदायिक लग्नांचा सर्व खर्च सरकारनं केला. प्रत्येक जोडप्याला संसारासाठी मिळणारे पाचशे रुपये म्हणजे एकूण

पाच हजार रुपये रावसाहेबांनीच हडप केले.

एकजण : काहीतरी बोलून आम्हांला फसवू नका. आमच्या पोरी कशा सुखात राहात असतील. रावसाहेब होते, म्हून त्या शेंबड्या पोरींना रुबाबदार शहरी नवरे मिळाले.

नेताजी : तुम्ही सारे शुंभ आहात. पण तुम्ही परत रावसाहेबांना सरपंच म्हणून निवडून दिलं, तर तुमचा सर्वनाश झाल्यावाचून राहणार नाही.

[ सगळे परत कामाला लागतात. ]

नेताजी : ( डायरी काढून लिहीत ) मंत्री झालो, की ह्या साऱ्या भडव्यांना सरळ करायचं. ( डायरी ठेवून देतो. ) या सामुदायिक विवाहांमुळं पण हा दगड्या चांगलाच पॉप्युलर झाला की ! पण घाबरायचं नाही. लढत अगदी प्राणपणाला लावून द्यायची. म्हणे, पोरी सुखात राहत असतील. कोगास ठाऊक, सुखात राहतात, की आणखी कुठं राहतात !

अं धा र

[ गंगूबाईचं घर—गंगूबाई कंदील घेऊन येते. नेताजी प्रवेशतात. ]

नेताजी : काय, गंगूबाई, कसं काय चाललंय् ?
गंगूबाई : ठीक चाललंय्, नेताजी. दोन दिवस आला नाहीत ?
नेताजी : तालुक्याच्या गावी गेलो होतो. बरं, काय विशेष ?
गंगूबाई : काय नाही, बाबा.
नेताजी : सावित्रीचं काही पत्र बित्र ?
गंगूबाई : तिचं नाव काढू नको. आता येऊ दे, चांगलं वाजवते तिला! शहरात गेली आन् नवऱ्यावरूवर रमली. आईचा इसरच पडला की तिला.
नेताजी : असं कसं होईल, गंगूबाई ? काही झालं, तरी पत्र यायलाच

पाहिजे ! नाही म्हणजे मुलगी कुठंही गेली, कितीही सुखात असली, तरी माहेरची माया एवढ्या चटकन् विसरत नाही.

गंगूबाई : तुमी म्हणता, ते बी पटलं. काल रावसाहेबांकडे जाऊन आली. तर ते म्हणाले, की ती न् तिचा नवरा हानीमूनला गेलेत, म्हून. सरकारनं पाठवलं त्यांना.

नेताजी : (खळखळून हसत) रावसाहेबांचं सरकार चांगलंच रंगेल दिसतंय् की !

गंगूबाई : कुठं आलं, हो, नेताजी, ह्ये हानीमून ?

नेताजी : गंगूबाई, हे सगळं खोटं आहे. मला ह्यात काहीतरी काळंबेरं दिसतंय्.

गंगूबाई : तुमचं आपलं ह्ये नेहमीचं रडगाणं. त्या देवमाणसावर काही तरी आरोप करायचे.

नेताजी : तसं नाही, गंगूबाई, एक महिना उलटून गेला; पण एकीचंही पत्र नाही...

गंगूबाई : त्या सगळ्यांस्नी बी सरकारनं हानीमूनला पाठवलं आसंल.

नेताजी : कुणी सांगितलं ? रावसाहेबानं ?...

गंगूबाई : सगळंच सांगाया पाहिजे का ?

नेताजी : बरं, मी चलतो, गंगूबाई. ह्ये घे पाच रुपये.

गंगूबाई : कशापायी ? तुमी नेहमी नेहमी काय, नेताजी, पैसं देता ?

नेताजी : असू दे. सावित्री गेली. ती असती, तर कशाला दिले असते ? (गंगूबाई पैसे घेते.) पण एक लक्षात ठेव, गंगूबाई. रात्र वैऱ्याची आहे, जागी राहा...!

[नेताजी निघून जातो. गंगूबाई विमनस्क उभी राहते. कंदिलाची वात बारीक करून जवळच बसते.
पार्श्वभागी पिपाण्या, ढोल, ताशे ह्यांचे आवाज होत आहेत.
तेवढ्यात राधा प्रवेश करते. तिचा श्वासोच्छ्वास जोरात सुरू आहे. अंगावरचे कपडे चोळामोळा झालेले दिसत आहेत.]

राधा : मावशी...गंगूमावशी...



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. .........नों. दि .........

गंगूबाई : कोण...कोण...राधा...राधा तू...?

राधा : ( स्फुंदून रडत ) मावशी, ग. आमच्या आयुष्याची माती झाली, ग... माती झाली!

गंगूबाई : काय झालं ? बोल, ग, माझ्या राधे ! एवढ्या रात्री कुठून आलीस ?

राधा : मावशे...मावशे...रावसाहेब कसाई हाय, ग! त्यानं पैसं घिऊन आम्हांला इकून टाकलं, ग...इकून टाकलं !...खोटं लगीन लावलं. नवरे बी आणले, त्ये सारे डाकू, चोर हायेत. आमाला धंदा करावा लागतू ग, आमच्या शरीराचा ! सावित्रीला बी धंदा करावा लागतो.

गंगूबाई : काय बोल्ती ह्ये, राधा, तू ?

राधा : तुझ्या गळ्याची शपथ, मावशे. आमाला श्रीमंताच्या घरी झोपाया पाठिवलं जातं. आज मी पळून आले मी कशी तरी. माझ्या मागं गुंड लागल्यालं हायती.

[ राधा कोपऱ्यातल्या कळशीतलं पाणी ग्लासमध्ये ओतून पिते. ]

राधा : मावशी, आईला भेटाया जीव कासावीस हून राह्यला. जाते मी. सकाळला येती. सगळे मिळून पुलीस थान्यावर जाऊन तकराद करू.

[ राधा वाऱ्यासारखी निघून जाते. गंगूबाई अवाक् होऊन पाहत राहते, ]

गंगूबाई : धंदा ? माजी सावित्री धंद्याला लागली ? नाई ! खोटं हाये ह्ये. रावसायेब, जर माजी सावित्री धंद्याला लागली, तर तुझं रगत पिऊन टाकीन !

[ हळूहळू लाईट्स् ऑफ होतात. रातकिड्याच्या किरकिरीतून कोंब-ड्याच्या आरवण्याचा आवाज येतो. सखूबाई प्रवेश करते. आणि कंदील विझवते. ]

सखूबाई : गंगूबाई...गंगूबाई.

गंगूबाई : सखू...सखू...

सखूबाई : काय झालं ?

गंगूबाई : सखू, राधा...राधा कुठं ?

सखूबाई : राधा ?

गंगूबाई : हं.

सखूबाई : मुंबयला.

गंगूबाई : नाई, सखूबाई. रातीला राधा येऊन गेली. म्हणाली, रावसायब कसाई हाये. त्यानं आमाला धंद्याला लावलं. आमाला श्रीमंताच्या घरी झोपाया पाठवलं जातं.

सखूबाई : शी...! गंगूबाई रामपहारी कसलं वंगाळ बोलून राह्यली.

गंगूबाई : खरंच, सखू, हा पाय उताना प्येला. राधा रातीला ह्यातनं पाणी प्याली आणि म्हणाली, आईला भेटाया जीव कासावीस हुतो. आन गेली.

सखूबाई : सपान पडलं तुला, गंगूबाई.

गंगूबाई : नाई, सखू, हा पाय प्येला, ह्याच पेल्यातनं पाणी प्याली ती !

सखूबाई : मग तुला भेटली राधा, मग गेली कुठं ? मला का न्हाई भेटली ? गंगूबाई, चलते मी, तुला येड लागलं वाटतं.

[ सखूबाई निघून जाते. ]

गंगूबाई : मला येड लागलं ? सावित्री धंद्याला लागली ?

अं धा र

[ गंगूबाई रडत आहे. नेताजी जवळ उभे आहेत. ]

गंगूबाई : असं झालं, नेताजी, रावसायबाकडे ग्येली, तर बिल्डिंगचं दारही उघडलं नाही.

नेताजी : (डोळ्यांत चमक येते आणि चेहरा हर्षोत्फुल्ल झालेला आहे.) वा ! वा !! वा !!! शेवटी, रावसाहेब, परिस्थितीच्या दोऱ्या माझ्या हातांत अलगद येऊन पडल्याच ! रावसाहेब, आता मुकाबल्याला तयार व्हा. नाही धूळ चारली, तर नावाचा नेताजी नाही ! प्रत्येक धंद्यात भांडवल लागतंय्. भांडवलाशिवाय धंदा होत नाही. राजकारण तरी त्याला अपवाद कसं असेल ? सामुदायिक विवाहाचं तुम्ही चांगलंच भांडवल केलं. पण आता त्याच भांडवलावर मला सारं काही मिळेल. गंगूबाई, तुला उपाय पाहिजे. उपाय...! रामबाण उपाय ! ! गंगूबाई, मी तुला दिलेले पंचेचाळीस रुपये शेवटी कारणी लागलेच, गंगूबाई... सापडला उपाय ! उपोषण, आमरण उपोषण... एका दुर्बल विधवेचं तिच्या मुलीसाठी आमरण उपोषण !

अं धा र

[ सर्व विंगांमधून काही स्त्री, पुरुष रंगमंचावर प्रवेशतात. ]

: व्हय. रावसायबांच्या बिल्डिंगच्या समोरच बसली, म्हणे, गंगूबाई !

: जोपर्यंत रावसायब तिच्या सावित्रीला परत आणणार न्हाई, तोपर्यंत ती उपोषण करणार, म्हणे.

: निसतं उपोषण न्हाई. आमरण उपोषण.

: म्हंजी ?

: म्हंजी मरेस्तोवर उपोषण.

: तोपर्येन काही खाणार नाही, पिणार नाही.

: काही बी न्हाई ?

: काही बी न्हाई !

: त्वांड बघा तिचं. पोरीच्या कमाईवर जगत व्हती. आता सोताला करावं लागीन, म्हून कशी स्वांग घेती म्हातारी.

: पण काय, रं ? खरंच इकलं आसंल रावसायबांनी पोरीला ?

[ क्षणभर शांतता. ]

: रावसायब म्हटले, नेताजी विलेक्शनसाठी डाव लढून राह्यले, म्हणून; मला बदनाम करण्यासाठी गंगूबाईला फूस लावलीया, म्हणून.

: त्येबी खरं असंल म्हणा. नेताजी हमेशा गंगूबाईच्या झोपडीत घुसलेला असायचा.

: देवाला ठावं, काय खरं आन् काय खोटं !

: आपल्या पोरींचीबी पत्रं न्हाई आलीत की, निरोप बी नाय आला. मला तर वाटतं, रावसायबानं खरंच इकल्या बी आसतील !

[ ‘ रावसायब आले ! ’ असा गलका होतो. ]

रावसाहेब : ( बरोबर असलेल्या एकाशी बोलत ) काय बी येड्यावाणी बोलू नगा. मुकाट बसा !

[ सर्वजण रावसाहेबांना नमस्कार घालतात ]

रावसाहेब : तुमचा बुद्धिभ्रंश झालाय् ! मी सांगतो, त्या नेताजीच्या नादी कुणी लागू नका. साला, इलेक्शन जिंकण्यासाठी डाव लढून राह्यला. मला बदनाम करण्यासाठी गंगूबाईला फोडलं त्यानं. तुमी लोक पाहत न्हाई, कसा रात्र रात्रभर तिच्या झोपडीमध्ये घुसलेला राहतो ! ( सगळे जण हा हा करतात. ) चलतो आम्ही !

[ रावसाहेब जातात. ]

: काय समजत न्हाई, कोण खरं, कोण खोटं.

: खरं खोटं जाऊ द्या. पोरीचं काय ?

: बायजाबाई, काय करावं, त्ये समजत न्हाई.

: असं म्हणू नका, काही तरी क्येलंच पाहिजे.

: त्ये ठीक हाय. आमचा बी जीव तीळ तीळ तुटतो. पण पण राव-सायबांच्याइरुद्ध उभं राह्यचं, म्हंजी जरा...

[ तेवढ्यात नेताजी त्यांच्या मध्ये येतात. ]

नेताजी : गंगूबाई रावसाहेबांच्या विरुद्ध नाही, तर अन्याय, विश्वासघात आणि शोषणाच्या विरुद्ध लढत आहे. अहिंसात्मक लढाई, महात्मा गांधींचा मार्ग आपल्या सर्वांचं हे कर्तव्य आहे, की ह्या अन्यायाविरुद्धच्या लढाईत आपण त्या गरीब विधवेला पाठिंबा दिला पाहिजे. चला, ह्या पत्रावर सह्या करा. ( नेताजी खिशातून दोन–तीन पानी पत्रक काढतात. ) चला, आता तरी शहाणे व्हा. ( नेताजी एकेकाचे सह्या–अंगठे घेऊ लागतात. ) चला, अन्यायाविरुद्ध आवाज उठवा. शहाणे व्हा. भ्रष्टाचाऱ्यांना धडा शिकवा. आपल्या गावात सिंहाचे कातडे पांघरलेला लांडगा आहे, आणि तुम्ही लोकांनी त्यालाच निवडून दिलं, विचार करण्यासारखी गोष्ट आहे. मी हे पत्रक कलेक्टर, कमिशनर, गृहमंत्री, मुख्यमंत्री आणि पंतप्रधानांना पाठवणार आहे. हे पत्रक सर्व पेपरांमधून प्रसिद्ध करणार आहे. हा अत्याचार करणाऱ्याला शिक्षा व्हायलाच पाहिजे. परंतु तुम्ही लोकही जरा समजून घ्या, विचार करा. चुकीच्या माणसाला गावप्रमुख केल्याचा परिणाम काय होतो. निदान ह्या पुढं तरी... रावसाहेब म्हणजे एक विषारी नाग आहे. त्याचा विषारी दात उखडून टाकला पाहिजे. रावसाहेबांच्या बिल्डिंगला घेराव टाकून सर्वजण उपोषण करा.

[ निघून जातात. ]

: चला, आपण बी उपोषण करू.

: नाही, बाबा, नाही.

: का नाही ? नेताजी मुख्यमंत्र्यापर्यंत तकराद करणार हायेत. काय बी असो, आपआपल्या पोरी आता परत मिळायलाच पाहिजेत.

: नाई, बाबा, आपण जर उपोषण केलं, तर आपलीच बदनामी हुईल. जातीमध्ये सारे छीः थू : करतील. अजून आपली लग्नाची पोरं—बाळं हायेत. गंगूबाईचं तसं न्हाई.

: पण येक पोरगी धंद्याला लागली, त्ये कोणचं चांगलं हाये? तिच्याबद्दल काही माया, ममता—काय काळीज हाय, की न्हाई, का दगड झाला काळजाचा ?

: वाटतं, तेवढं सोपं न्हाई. एक पोरगी गेली, तर गेली, आता त्येला काय करायचं, तिचं बिचारीचं नसीब फुटकं आसंल. पण बाकी गोष्टींकडं तरी लक्ष ध्येयाला पायजे. ह्या गावात आपल्याला न्हायचं हाये. रावसायबांशी वैर करून न्हाई चालणार, बाबांनो, न्हाई चालणार.

: काहीच समजत नाहीये, काय करावं आन् काय न्हाई.

: पण त्या नेताजीनं आपले आंगठे घेतले पत्रकावर, त्येचं काय ?

: त्येचं काय यवढं ?

: उद्या कोरट, कचेरी झाली, तर ?

: तर सांगून देयाचं...नेताजीनं धोका देऊन अंगठा घ्येतला, मायबाप !

[ सर्वजण चेतनाशून्य होऊन बसतात, तेवढ्यात लंगडा, पांगळ राम्या गाणं म्हणत प्रवेशतो ]

राम्या : थ्या, थ्या कुबड्या ह्या माझ्या, तुमच्या पायांमंदी रक्त नाहीये माणसाचं कुत्र्यांचं हाय, तुमच्या मनगटामंधी हाडं नाहीत, हाये फक्त मांस —गांडूळाचं ! आरं, तुमच्या जिभा फक्त लाळ घोटायासाठी, हिजडे आहात, भडवे हो ! रावसायब तुमच्या पोरीचं, बहिणीचं शरीर इकतो आणि तुमी हिजड्यावाणी पडून राहिलात. तुमाला उठा म्हणत न्हाई मी, माझ्या जिभंला इटाळ हुईल, झोपून जा, भडव्ये हो ! कायमचे झोपून जा ! ( परत गाणे म्हणत निघून जातो. )

अं धा र

[ गंगूबाई उपोषणाला बसलेली दिसत आहे. ती अगदी ग्लान होऊन पडलेली आहे. तिच्या तोंडून फक्त 'सावित्री, सावित्री' असे अस्फुट शब्द, पार्श्वभागातून लग्नाच्या वेळचे संगीत, डोलीच्या वेळचे गीत आणि राधाचे संवाद. ' आमाला धंदा करावा लागतो, ' हे ऐकू येते. थोड्या वेळाने नेताजी आणि एक पत्रकार प्रवेशतो. ]

नेताजी : तर, साहेब, एकंदरीत हा असा प्रकार आहे. मानवतेची विटंबना करणारे असे उदाहरण देशात पहिल्यांदाच घडलेले असावे. ग्रामीण परिसरातल्या दुर्बल, अशिक्षित माणसांवर असे अन्याय घडत असताना माझ्यासारख्या सुशिक्षित माणसाचे मन निखाऱ्यासारखे पेटून उठले आहे. ह्या अन्यायाविरुद्ध मी युद्ध पुकारले आहे. अं...तुम्ही फोटो काढा.

[ पत्रकार त्यांचा फोटो काढू लागतो. ]

नेताजी : माझा नाही. गंगूबाईचा काढा.

[ पत्रकार गंगूबाईचा फोटो काढतो. ]

पत्रकार : मी जरा बाईशी बोलतो.

नेताजी : बाईची मनःस्थिती जरा बिघडली आहे. तुम्हांला काही शंका असतील, तर मलाच विचारा.

पत्रकार : ठीक आहे.

नेताजी : मी उद्या मुंबईला जाणार आहे.

पत्रकार : तुम्ही कोणत्या मार्गानं जाणार आहात.

नेताजी : इथून मनमाडला जाऊन मुंबईला रेल्वेने जाणार आहे.

पत्रकार : नाही, म्हणजे तुम्ही हा सत्याग्रह, हा लढा कोणत्या मार्गाने नेणार आहात ?

नेताजी : अहिंसात्मक मार्गानेच आम्ही हा लढा देणार आहोत. महात्मा

गांधींच्या शिकवणीनुसार आमच्या ह्या सत्याग्रहाचे स्वरूप राहणार आहे. (या वेळी हातातला गांधींचा फोटो तो दाखवतो. मग गंगूबाईजवळ जाऊन तिच्या हातात देतो.) गंगूबाई, ह्या फोटोचं ध्यान करा. अन्याय करणाऱ्यांचं हृदय-परिवर्तन होईल, नाहीतर सर्वनाश तरी होईल !

पत्रकार : बरं, मी चलतो.

नेताजी : चला, परंतु ह्या घटनेचं उत्तम फीचर तयार करा, आणि प्रसिद्धीही द्या. आजच्या जगात वृत्तपत्राएवढं उत्तम माध्यम कोणतंही नाही. तुम्हांला मी सर्व माहिती दिलीच आहे—ह्या घटनेची आणि माझी.

पत्रकार : तुम्ही निवडणुकीला उभे राहणार आहात, वाटतं.

नेताजी : नाही, लोकांची सेवा करणे हे माझे जीवनाचे ध्येय आहे, मार्ग आहे. त्यांची तशी इच्छा असली, तर मला माझ्या ध्येयाविरुद्ध जाणे भाग पडेल. असो, मनोहर साहेब, थँक्यू फार युवर काईंड को-ऑपरेशन.

पत्रकार : माय् ड्यूटी. ओ० के० (निघून जातो.)

[नेताजी गंगूबाईजवळ येतात आणि खिशातून काढून सह्या घेतलेले पत्रक दाखवतात.]

नेताजी : गंगूबाई, रावसाहेब सोडून साऱ्या गावाचे अंगठे गोळा केलेत. सर्व काही फिट्ट झालं, उद्याच जाऊन कमिशनर साहेबांना हे पत्रक देऊन टाकतो आणि मग पाहा गंमत. चोवीस तासांच्या आत रावसाहेबाच्या हातांत बेड्या पडतील. (उठून उभे राहतात.) आता संघर्षाची ठिणगी पडली आहे. ह्या संघर्षाच्या सफलतेत माझ्या जीवनाची सफलता सामावलेली आहे. यशाच्या पायऱ्या चढणं आता कठीण राहिलेलं नाही, पहिल्या प्रथम ह्या इलेक्शन-मध्ये साहेबरावांचा पराभव करून गावप्रमुख व्हायचं. मग झेड्०पी०, मग एम्०एल्० ए. आणि मग मंत्री, एअर कंडिशण्ड कोचमधून देशप्रवास, ही संधी वाया जायला नको. वातावरण तर चांगलंच

निर्माण होऊन राहिलंय्.

[ तेवढ्यात एक पोलिस प्रवेशतो. ]

पोलीस : नेताजी, तुम्हांला फौजदारसाहेबांनी भेटायला बोलावलंय्.
नेताजी : रावसाहेबांकडे जाऊन आला वाटतं.
पोलिस : होय. त्यांनाही बोलावलंय्.
नेताजी : अशा कॉम्प्लिकेटेड् केसमध्ये फौजदारसाहेब एव्हाना गावात पोहोचायला पाहिजे होते. ठीक आहे. त्यांना सांग, टाइम काढायचा प्रयत्न मी करेन, म्हणा !

[ रावसाहेबांचे घर, सकाळ झालेली आहे. रावसाहेब घाईघाईत शर्ट घालतात. ]

रावसाहेब : अग, ऐकू येतं, का न्हाई ? किती वेळ ? तो नेताजी पोहोचायच्या आत पोहोचलं पाहिजे मला, नाहीतर सगळा बट्ट्याबोळ होईल. आन् चिक्कूपणा करू नगंस. त्या फौजदारणीला शाकाचं लोणचं लई आवडतं. त्ये जरा जास्त घाल, आन् खरवस बी जरा जास्त घाल.

[ रावसाहेबांची बायको एक गाठोडं घेऊन प्रवेशते. ]

बायको : घ्या.
रावसाहेब : नसतं लचांड हाये, बग. हा फौजदार, साला, निसता फुकटखाऊ आहे. जरा पैसे घेऊन ये.
बायको : किती ?
रावसाहेब : घेऊन ये हजार एक.

[ ती आता जाते, रावसाहेब समोर जमिनीवर पडलेलं खेळणं

उचलतो. त्याला चावी भरतो खेळण्याचा आवाज. बायको हातात नोटा घेऊन प्रवेशते. ]

ती : घ्या.

रावसाहेब : ( पैसे घेतो, खेळण्याला चावी भरून निघायला लागतो. ) चलतू मी.

ती : पण ह्ये काय ? ह्ये राघूचं खेळणं कुठं घिऊन चालले ?

रावसो : फौजदाराला एक पोरगा हाये ना, त्येला देतो. राघूला नवीन आणू. ( जायला निघतो. एकदम थांबतो. ) ए नर्मदे, जरा पाय तर, गंगूबाई काय करतीया.

ती : ( डोकावून पाहते. ) अजून झोपेतच हाय की.

रावसो : ठीक, बरं झालं. नसतं लचांड ! चलतू मी ! ( हळूच बाहेर पडतो. )

[ घोड्याच्या खिंकाळण्याचा आवाज होतो. गंगूबाई एकदम जागी होते. घोड्याच्या टापांचा आवाज. ]

गंगूबाई : ( धावत जाऊन ) तुझा मुडदा पडो, मेल्या ! कशाला पळून जातू ?... आता परत दिस ! न्हाई रगत प्याली तुझं तर ! ( माडीवर पाहत ) ए, सटवे, मेली, रांडेची. तुझं कुंकू पुसलं जावो, मेलीचं !

[ तडफडत परत कोपऱ्यात येऊन शिथिल होऊन पडते. 'सावित्री, सावित्री' असे अस्फुट आवाज.

फौजदाराचे घर– घोड्यांच्या टापांचा आवाज दूरवरून जवळ जवळ येतो. थोड्या वेळाने रावसाहेब प्रवेशतात. फौजदारांचा नोकर त्यांचे स्वागत करतो. ]

रावसाहेब : हायेत का सायेब घरात ?

नोकर : हायेत. बसा जरा. पूजा करून राहिलेत.

[ रावसाहेब बसतात. तेवढ्यात फौजदार मिशीवर पीळ देत प्रवेशतात. ]

फौजदार : हां तर, रावसाहेब, काय हाहाकार माजवून ठेवलाय् तुम्ही. अं ? माझ्या तीस वर्षांच्या सर्व्हिसमध्ये असं क्रिमिनल गाव पाहायला नाही मिळालं ! पैशासाठी गावातल्या पोरी विकायच्चं, म्हणजे इट इज टू मच.

[ रावसाहेब हात जोडून उभे राहतात. ]

रावसाहेब : माझं एकून तर घ्या, सायेब.

फौजदार : काही ऐकून घेणार नाही मी. तीस वर्षं झाली, ऐकूनच घेतोय् मी. जो येतो, तो ऐकवतो. मी म्हणतो, जर ती म्हातारी अं...काय नाव तिचं... ?

रावसाहेब : गंगूबाई !

फौजदार : हां. तर ती मेली, तर दहा वर्षं खडी फोडायला जावं लागेल.

रावसाहेब : सायेब, इस्वास ठेवा माझ्यावर, ही सारी नेताजीची करतूत हाये. विलेक्शनमध्ये मला पाडण्यासाठी, साहेब, अडाणी गावकऱ्यांना भडकावून देऊन गांधी-नेहरूंच्या तोंडावर काळं फासून राहिलेत नेताजी ! आमी तर, सायेब, पब्लिकच्या कल्याणाकरता, गोरगरिबांच्या मदतीकरता, जातीपातीच्या इरुद्ध हाये मी; सायेब, सामुदायिक इवाह एकदम आदर्श झाले. पेपरांमंदी आऊट झालं. आपल्या गावाचं, आणि खास करून आपल्या चौकीचं नाव उजळ झालं.

फौजदार : पोलिसवाल्यांना तुम्ही महामूर्ख समजता काय ? कालच सी.आय्. डी. इन्स्पेक्टर इन्विस्टीगेशन रिपोर्ट देऊन गेला. मुलींचा धंदा करणाऱ्या नालायक लोकांच्या यादीत तुमचं नाव रेड इंकमध्ये लिहिलंय्. ( फौजदाराचं लक्ष रावसाहेबांच्या हातात असलेल्या गाठोड्याकडे जाते. ) काय आहे ह्याच्यात ?

रावसाहेब : काही न्हाई, थोडंसं शाकाचं लोणचं, खरवस, पापड, हायेत.

पण, साहेब, या नेताजीबद्दल सांगावं, तेवढं थोडंच हाये. नेहमी इरुद्ध गोष्ट. आमच्या इरुद्ध, आपल्या इरुद्ध आणि जनतेच्याबी इरुद्ध. मुख्यमंत्री आणि आणि पंतप्रधान ह्यांच्याशिवाय बोलतच न्हाई कधी. म्हणतात कसे, फौजदारइन्स्पेक्टर ह्यांना मी खिशामंदी वालून फिरतू!

फौजदार : ऑ? असं बोलतो साला? एवढा मोठा खिसा? ठीक आहे. येऊ द्या तर त्याला इकडे, मग पाहतो. चांगला सरळ करतो साल्याला! (फौजदार गाठोडं हातात घेऊन तोलून पाहतो.) आपल्याला माहिती असेलच, की मी चौकीसमोर एक मंदिर बांधत आहे. त्याकरता यथाशक्ती...

रावसाहेब : (खिशातून पैसे काढून) का नाही, सायेब? का नाही? आजकाल तर, सायेब, धर्म– इमान नावाच्या गोष्टी गायबच होत चालल्या हायेत.

फौजदार : (नोटा मोजतो. मग...) तुम्ही काय चेष्टा समजले, की काय? ही सी. आय्. डी. केस आहे.

रावसाहेब : अं? बरं मी परत येकदा चक्कर मारील, चल्तू मी. (जाऊ लागतो.)

फौजदार : ठीक आहे. आणि हो, त्या म्हातारीचं उपोषण ताबडतोब बंद करा. हरिजनांचा छळवाद नाही करता येत. एक तर जनरल इलेक्शन डोक्यावर आहे. वरून आदेश मिळालाय्, की हरिजनांना...अरे, हो! मी असं ऐकलंय्, की तुमच्या गावच्या तलावात खूप पाणकोंबड्या असतात, म्हणून. कधीतरी शिकारीला येईन मी.

रावसाहेब : जरूर या, साहेब, पण कधी येता?

फौजदार : कधी पण येईन; पण बंदोबस्त एकदम मस्त व्हायला पाहिजे.

रावसाहेब : जरूर हुईल, सायेब, तुम्ही फक्त कळवा. सगळा बंदोबस्त करतू. (जातात.)

फौजदार : चारसो वीस, लाज विकून खाल्ली आहे भडव्यानं! पण हात चांगले वरपर्यन्त पोहचले आहेत साल्याचे. (तेवढ्यात नेताजी प्रवेशात. फौजदार त्यांना पाहतो.) हं. तर आपणच आहात, तर, नेताजी!

नेताजी : ( रूक्षपणे ) आपण कोण ?

फौजदार : मी ?... मी फौजदार.

नेताजी : म्हणजे मिस्टर अहीरराव. बोला, बोलावणं करण्याचं निमित्त काय ?

फौजदार : नेताजी, आपलं खरं नाव आहे ?

नेताजी : म्हणजे खरं नाव तर पांडुरंग दशरथ......

फौजदार : तर ' नेताजी ' आपोआप झाले ? जन्मापासूनच ' नेताजी ' ?

नेताजी : आपण फक्त मुद्द्यावर बोला, मिस्टर अहीरराव.

फौजदार : ठीक आहे, मुद्द्याचंच बोलतो मी आता. सी. आय्. डी. हेड-क्वार्टरकडून आपल्याबद्दल पर्सनल रिपोर्ट मागवून मी वाचला आहे. तुम्ही नक्शलाईट, अनार्किस्ट, टेररिस्ट आहात !

नेताजी : ( गंभीरपणे ) मिस्टर अहीरराव, मला कॉन्फिडेन्शियल फायलीतल्या एंट्रीज् सांगू नका. हे सांगा, मला इथं का बोलावण्यात आलं आहे ?

फौजदार : हे विसरू नका, मिस्टर, की...

नेताजी : विसरायच्या नाही, लक्षात ठेवायच्या गोष्टी करा, अहीरराव.

फौजदार : ऑं ?... चार-आठ आण्यांच्या पांढऱ्या टोपीची ही हिम्मत, की फौजदाराच्या वर्दीवर डोळे वटारायचे ? ठीक आहे. लक्षात ठेवायची गोष्ट बोलतो. जीवनभर आठवण काढत राहाल, नेताजी. ( थरथर कापायला लागतात. ) सरकार उलथवण्याचे प्रयत्न करणारे तुम्ही, इल्लिटरेट् मासमध्ये रूमर्स पसरवणारे तुम्ही, व्हायोलन्स आणि डिस्टर्बन्स करणारे तुम्ही सरकारी नीतिमत्तेच्या विरुद्ध तुम्ही, आंतर-जातीय विवाहांच्या विरुद्ध तुम्ही डेमॉक्रसीकरता धोकादायक तुम्ही, देशाकरता धोकादायक तुम्ही, सगळ्यांसाठी धोकादायक तुम्हीच. तुम्हांला काय वाटतं ? तुमच्या घरातून आम्ही गांजा काढू, दारू पकडून देऊ, अफू शोधून देऊ, पोरगी धरून दाखवू ? तुमची नेतागिरी आम्ही गाडू शकतो, तुमचं कॅरेक्टर वाईट करू शकतो. फ्यूचर स्पॉईल करू शकतो...

[ तेवढ्यात फौजदाराची बायको हातात दोन मग्ज्मधून चहा घेऊन प्रवेशते. ]

फौ. बा. : काय चाललंय् मोठमोठ्यानं बोलणं ? कोणावर हल्ला करताय् ? घरी आलेल्या पाहुण्याशी कोणी असं बोलतं का ? भाऊसाहेब, तुम्ही चहा घ्या.

[ नेताजी उठून ' धन्यवाद ' म्हणत नमस्कार करतात व चहाचा मग घेतात. ]

फौ० बा० : धन्यवाद नंतर. हां, भाऊसाहेब, पहिल्यांदा चहा तर पिऊन पाहा.

फौजदार : हो. हो. करा सुरू ! आपली लढाई माझ्याशी आहे...

नेताजी : लढाई कसली, साहेब ?

फौ० बा० : तुमचे सगळे हवालदार माझ्याकडे आले आणि म्हणाले, बाईसाहेब तुमचे भाऊ आलेत काय ? फौजदारसाहेब एवढ्या मोठ्यानं तावातावानं का ओरडून राहिलेत ? ( नेताजीला ) माझा भाऊ पण अगदी तुमच्यासारखाच आहे. दूध पाणी वेगवेगळं करून दाखवणारा. ह्यांच्याशी मुळीच पटत नाही.

नेताजी : ( मोठ्यानं हसत ) ह्यांच्यासारख्या जीजाजीला ताब्यात ठेवणं आपल्यासारख्या बहिणीलाच शक्य आहे.

फौजदार : बाय् द वे; माझी ह्या ठाण्यावर जेव्हा रिटायरमेंटपूर्वी विश्रांतीकरता बदली झाली, तेव्हा बापू देशपांड्यांनी तुमच्याबद्दल माझ्याजवळ खूप प्रशंसा केली होती. बापूजींना मी मोठ्या भावासमान मानतो. म्हणून आता मी जे काही कडवट, तिखट बोललो, तेही आपुलकीच्या नात्यानं बोललो. मला काय हे माहीत नाहीये का, तुमचं सारं जीवन तुम्ही गरिबांसाठी आणि असहाय लोकांसाठी......

नेताजी : मला तर, फौजदारसाहेब, गरिबांसाठी माझी मान कापायची वेळ आली, तरी मी मागचा–पुढचा विचार करणार नाही. परंतु हा जो रावसाहेब आहे ना.,....

फौजदार : शी...शी ! मला सगळं माहीत आहे. फक्त ठोस पुराव्याची आवश्यकता आहे. जर आपलं सहकार्य मला मिळालं, तर...

नेताजी : आपल्याकरता तन– मन– धन हजर आहे. माझी इच्छा आहे,

की रावसाहेब......

फौजदार : हे पाहा, नेताजी, हाय ऑथॉरिटीज्च्या इंटरफिअरन्समुळं कधी कधी सहज होणारी गोष्ट पण होत नाही. मी असं ऐकलं आहे, की तुम्ही डायरेक्ट कमिशनर साहेबांकडे तक्रार पाठवली आहे. आता तुम्हीच सांगा, ह्या प्रकरणाची चौकशी मला करायची आहे, की कमिशनरला? आणि आणखी एक गोष्ट लक्षात ठेवा, की जो जेवढ्या वरच्या खुर्चीवर बसलेला असतो, तो तितकाच कामचोर आणि नालायक असतो. ह्या प्रकरणाचा उलगडा माझ्यासारखा एक फौजदार जितक्या सहजपणे करील, तेवढ्या सहजपणे दहा कमिशनर सुद्धा करू शकणार नाहीत.

नेताजी : बरोबर आहे. बरोबर आहे तुमचं म्हणणं, साहेब! ज्याचं काम, तोच चांगलं करू शकतो, अशी म्हण उगाच नाही पडलेली. पण माफ करा. आपण माझ्याबद्दल टोटली गैरसमज करून घेतलाय्. कारण हे कधी शक्य आहे का, की आपल्याला भेटल्याशिवाय मी तक्रार पाठवीन? (खिशातून तक्रार—पत्रक काढतात.) आणि तपासाचं काम एवढं तत्परतेनं सुरू असताना मी तक्रार पाठवीनच कसा? घ्या हे कागद, तुमच्या इच्छेप्रमाणे फाडून टाका, नाहीतर जाळून टाका. पण हो, केसचा निकाल जरा तावडतोब लावा, कारण ह्या वेळी मी सुद्धा......

फ़ौजदार : जरूर उभे राहा, साहेब, आमचा तुम्हांला पाठिंबाच राहील. तुम्हांला कोणत्याही प्रकारची आशा नाही, की महत्त्वाकांक्षा नाही; परंतु गावाच्या कल्याणासाठी काही ना काही त्याग...... आणि हो, मी लवकरच गावात चौकशीसाठी येणार आहे. शिकारीच्या निमित्तानं...

नेताजी : अच्छा, पण माझ्या विरुद्ध आलेल्या चौकशीबाबत...

फौजदार : ओ, डोंट वरी फॉर दॅट. मी फायनल रिपोर्ट तुमच्या फेवरमध्ये देईन, अच्छा. त्या म्हातारीला काय उपोषण करूनच मारून टाकायचं आहे, की काय... अं?

नेताजी : ते तर आवश्यकच आहे, साहेब, प्रत्येक माणसाला स्वतःच्या पद्धतीनं प्रोटेस्ट करण्याचा राइट आहे. परंतु माझ्या पोलिटिकल प्रॉस्पेक्टस्-

च्या दृष्टिकोनातून जरा विचार करा. इलेक्शनमध्ये लढण्यासाठी तेवढं एकच माझं भांडवल आहे.

फौजदार : ओ. के.

नेताजी : ठीक आहे. येतो मी. तुमच्या स्वागताची तयारी करायला सुरुवात करतो मी.

फौजदार : ऑल राइट !

[ नेताजी कोपऱ्यात येतात. खिशातून डायरी काढतात आणि लिहू लागतात. ]

नेताजी : मिनिस्टर झाल्यावर सर्वांत प्रथम ह्या फौजदाराचा हिशेब चुकता करायचा. शिवी दिली. मला नाही, माझ्या टोपीला.

अं धा र

[ घोड्यांच्या टापांचा आवाज दुरून जवळ जवळ येत जातो. रावसाहेब. गुपचूप प्रवेशतात. आणि घराच्या दिशेने जाऊ लागतात. तेवढ्यात गंगूबाई उठून त्यांचे पाय धरते. ]

गंगूबाई : माजी सावित्री आणून दे, कुऱ्या ! माजी फुलावाणी नाजूक सावित्री गाय–बकरी न्हाई इकण्यासाठी आन् तिजोरी भरण्यासाठी ! बेइमान ! तुज्या साऱ्या अंगाला किडं पडो, कोड फुटो !

[ रावसाहेब हिसका देऊन पाय सोडतात आणि घराच्या पायऱ्या चढतात. गंगूबाई टाहो फोडून रडायला लागते. त्या रडण्याच्या आवाजाने इतर लोक जमा होतात. ते गंगूबाईला कोपऱ्यात बसवतात. ]

गंगूबाई : हिजड्यांनो, हात लावू नगा माझ्या अंगाला !

[ नेताजी प्रवेशतात. ]

नेताजी : बंधूंनो, आपल्या अंगठे आणि सह्यांचे जे तक्रार-पत्र मी कमिशनर साहेबांना पाठवलं, त्या पत्रकावर ऑर्डर लिहून ते कमिशनर साहेबांनी फौजदाराकडे पाठवलं आहे. तपास तावडतोब करा, अशी ताकीद दिलेली आहे. फौजदार लौकरच तपासकामासाठी गावात येणार आहे. गंगूबाई, काही घाबरू नको. रावसाहेबांना आता अटक होईल आणि तुझी सावित्री तुला तावडतोब परत मिळेल. आणि गंगूबाई, फौजदार आला, की त्याच्या पायांवर पडायचं. तलावाकडं येणार आहे तो. मी तुला नेईन तिथं आणि रावसाहेबांची सारी करतूत सांगून द्यायची. आलं लक्षात ? मुळीच घाबरायचं नाही.

[ लोकांमध्ये चर्चा सुरू होते. नेताजी निघून जातात. राम्या जोरजोरात हसू लागतो. सगळे शांत होतात. ]

राम्या : रावसायब आणि नेताजी दोघं बी विषारी साप हायेत. सावध राहा.

: काय तरी वेड्यावाणी काय बोलतू, राम्या ? रावसायब आसंल साप, पण नेताजी देवमाणूस हाये.

राम्या : ( हसतो. ) नेताजी देवमाणूस ?... रावसायबानं लग्नं लावली, तवा त्यो देवमाणूस व्हता आन् आता नेताजी देवमाणूस. कलेक्टरला तक्रार देताना कुणाला बरूबर का न्हाई घिऊन ग्येला नेताजी ? फौजदारालाबी यकटा भेटून आला. ह्याच्यामंधी काळंबेरं हाय, रहस्य हाय. इचार करा. इचार करा. इचार करायची वेळ आली हाय आता. इचार करा. नाईतर ह्ये दोन नाग डसल्यावाचून न्हाणार न्हाईत.

[ हळूहळू अंधार होतो. पाणकोंबड्यांचे आवाज येत आहेत. रावसाहेब आणि दोन माणसं त्यांच्याबरोबर आहेत. ]

रावसाहेब : अन् हये लक्षात ठयेवा, फौजदारसायब आल्यावरूवर पिंजऱ्यातल्या कोंबड्या तलावाच्या काठावर सोडून देयाच्या, आलं लक्षात? कर म्हणावं, किती शिकार करायची, ती. ( समोर पाहत ) चला, सटका इथून! येऊन राह्यलेत शिकारीसाहेब.

[ फौजदार शिकाऱ्याच्या वेशात येतो. त्याच्या बरोबर एक हवाल्दार पण आहे. ]

रावसाहेब : या या, सायेब. बंदोबस्त एकदम 'फिट' झालायू. करायची तेवढी शिकार करा.

फौजदार : रावसाहेब, माझी तर इच्छा आहे, 'ए' ग्रेडची शिकार करायची. कधी बसून, कधी उभं राहून, कधी जमिनीवर पालथं पडून, डोंगराच्या माथ्यावर घसरत घसरत, ही शिकार एकदम व्हेजिटेरियन टाईप आहे. ठीक आहे. जो है, सो है. ( एकदम समोर चमकून पाहत, खांद्यावर बंदूक घेतात ) अं... पाहा, कशी उड्या मारतेयू! साली, चमकदार दिसतेयू. तिला माहीत पण नसेल, की आता तिच्या दिशेनं मृत्यू सूं...सूं...करत येईल, म्हणून! (घोडा दाबतात. गोळीचा आवाज होतो. पाणकोंबड्यांच्या फडफडण्याचा आवाज ) बचावली! नशीबवान दिसतेयू!

रावसाहेब : व्हयू! व्हयू!!

फौजदार : व्हय, व्हय काय? रावसाहेब, गावातल्या पाणकोंबड्यांवर तुमचा कंट्रोल नाही. तर माणसांवर काय असेल?

[ तेवढ्यात गंगूबाई प्रवेशते व फौजदाराच्या पायांवर पडते. ]

गंगूबाई : गरिबाचं रक्षण करा, मायबाप.

फौजदार : काय आहे? कोण आहे ही थेरडी? काय भानगड आहे ही?

गंगूबाई : सरकार, ह्या रावसायबांनी गावामधल्या पोरीबाळी इकून टाकल्या. ह्यांस्नी फाशीवर लटकवा, मायबाप, न्हाईतर आम्हांला गोळी घाला,

मायबाप. गुलाबाच्या फुलावाणी आमच्या पोरीबाळी...

फौजदार : गंगूबाई का तू ?

गंगूबाई : व्हय, सरकार.

फौजदार : हट्, पोरगी विकून आता नाटक करतेस का, थेरडे ? कशाला पैदा केली गुलाबाच्या फुलासारखी नाजूक पोरगी ? बोल, मला विचारून पैदा केली का ? (शांतता पसरते.) बोलव तुझ्या नवऱ्याला, साल्यानं कशापायी पैदा केलं गुलाबाचं फूल ?

गंगूबाई : (हात जोडून उभी राहते.) सरकार, त्ये तर आता जिंदा न्हाईत. त्यांच्याबद्दल काही वंगाळ बोलू नका. मायबाप, सायेब...सायेब...

फौजदार : 'सायेब सायेब' काय करते ? बोल...

गंगूबाई : सरकार, पैदा तर ह्या रावसायबांनीच क्येलं व्हतं.

फौजदार : व्हॉट ?

गंगूबाई : सरकार, माझे मालक तर तवा बाहेरगावी ग्येले व्हते. रावसायबांनी लांडग्यावाणी मला ओरबाडली. सायेब, सावित्रीचे बाप त्येच हायती.

रावसाहेब : सायेब, खोटं बोल्तीया ही !

गंगूबाई : न्हाई, सरकार ! माझ्या पोरीची शपथ घेऊन सांगते मी !

फौजदार : अच्छा. म्हणजे उद्या रावसाहेबांनी उपरत पैदा करून पोरगी विकली, तर मी नुसता रिपोर्टवर रिपोर्टच करत राहू काय फुकट ? तू पहिल्यांदी शिबिरात जाऊन लूप लावून घे. हवालदार, नोट करून घे. गंगूबाई, लूप केस.

[ तेवढ्यात राम्या प्रवेश करतो. ]

राम्या : किती गंगूबायांना लूप लावाल, फौजदारसायेब ? जोपर्यंत रावसायबांची जवानी गरम हाये...लूप लावायचं हाये, तर रावसायबांनाच लावा.

फौजदार : (चमकून) हा लंगडा कोण आहे ? सी. आय्. डी. तर...

रावसाहेब : (संतापत) वेडा आहे, साहेब ! त्याच्याकडे ध्यान नका देऊ.

फौजदार : गावातलाच आहे, की बाहेरून आलाय् ?

रावसाहेब : गावातलाच आहे, सायेब. ह्याच गावात पैदा झाला, पांगळा झाला आणि वेड लागलं त्येला, सायेब.

[ फौजदार थरथर कापत आहेत. ते सट्दिशी राम्याच्या पोटावर लाथ मारतात. ]

फौजदार : कुत्र्याची अवलाद ! मी इथं शिकार खेळायला आलोय्, की तुमच्या तक्रारी ऐकायला ?

[ राम्या धाडकन् पडतो. धडपडत उठतो. ]

राम्या : मानसांची शिकार करूनशान मन शांत न्हाई झालं, तर कोंबडयांची शिकार करून बी मन शांत न्हाई हुनार, फौयदार साहे...ब.

फौजदार : हवाल्दार, ह्याचं नाव नोट करा.

रावसाहेब : सायेब, त्या पाहा दोन कोंबडया, गोळी मारा, सायेब. परंतु सावधानीनं, सायेब.

[ फौजदार नेम लावत निघून जातो. हवाल्दार आणि रावसाहेब राम्या व गंगूबाईला धक्के मारून हाकलून देतो. ]

गंगूबाई : तुझा सत्यानाश हुईल, मुडद्या ! तुझा वंश नष्ट हुवून जावो. तू बरबाद होवो, कुत्र्या !

[ रावसाहेबाचा मुलगा राघू, १०–१२ वर्षांचा, प्रवेशतो. ]

राघू : दादा, माईनं सांगितलंय्, नाश्टा तयार हाये, म्हणून.

रावसाहेब : ठीक हाय. तुझ्या माईला सांग, साडीबिडी नीट, येवस्थित घाल, म्हणून. ( राघू जातो. )

रावसाहेब : हवाल्दारसायेब, सायेब कुठं गेले ? चला पाहू, पाहून येऊ.

[ दुसऱ्या विंगेतून फौजदार बंदूक रोखत प्रवेश करतो आणि गोळी झाडतो. नेताजी टाळ्या वाजवत प्रवेशतात. ]

नेताजी : वा ! वा ! ! वा ! ! ! फौजदारसाहेब, नेम अगदी बरोबर बसला.
फौजदार : अरे, कोण ? नेताजी ? हॅलो.
नेताजी : हॅलो, कसं काय आहे ?
फौजदार : गावात आल्यापासून तुमची आठवण काढत होतो.
नेताजी : साहेब, तुमच्या स्वागताचा बंदोबस्त करत होतो.
फौजदार : म्हणजे ?
नेताजी : साहेब, आम्हांला समजलं, की ताईसाहेबांना मटन बिटन काही चालत नाही. म्हणून म्हटलं, साहेब उपाशी असतील. त्याकरता बायकोला सांगितलं, मस्त मटन बनव. माझे जीजाजी येणार आहेत. आणि...( खिशातून थ्रीएक्स रम ची बाटली काढून दाखवतात. )
फौजदार : अरे, वा ! वा, वा ! तुम्ही तर कमालच केली की, नेताजी ! ( नेताजींना मिठी मारतात. )
नेताजी : खास ह्याची व्यवस्था करण्यासाठी सकाळीच तालुक्याच्या गावी गेलो होतो. चला, चौकशी आणि शिकार नंतर होईल.
फौजदार : चला.

[ दोघेही जातात.

रावसाहेब प्रवेश करतात. दोघांनाही जाताना पाहतात. ]

रावसाहेब : फौजदारसाहेब.
फौजदार : आता मध्येच कोण आलं डिस्टर्ब करायला ? ( ओरडतात. ) गेट आऊट.
रावसाहेब : ( चकित होऊन ) सायेब, मी रावसायेब.
फौजदार : कोण रावसाहेब ? रावसाहेब, पोरी विकण्याच्या लफड्यात तुम्ही पूर्णपणे इन्व्हॉल्व्ह झालेले आहात. आणि दुसरं म्हणजे तुम्ही बलात्कारही केला आहे.
रावसाहेब : बलात्कार ?
फौजदार : होय. बलात्कार ! गंगूबाईवर तुम्ही बलात्कारच केला होता. तुमच्या-

बद्दल आणखीही काही ' कंप्लेंटस् ' मला मिळाल्या आहेत. ( कोपऱ्यात घेऊन ) आता भलं ह्याच्यातच आहे, की कसंही होवो, त्या म्हातारीचं प्रकरण ताबडतोब मिटवा, नाहीतर नष्ट करा. आणि नंतर घरी येऊन मला भेटा. नाहीतर नेताजी तुम्हांला बरबाद केल्याशिवाय राहणार नाही. चला, नेताजी.

[ दोघे जातात. रावसाहेब पाहतच राहतात. ]

रावसाहेब : मात ? माझ्यावर मात ? ठीक आहे, नेताजी, ह्या रावसायबाच्या शरीरातही मराठ्याचं रक्त खेळतंय्.

अंधार

[ नेताजींचं घर. ]

ने०बा० : सगळ्या गावामंदी चर्चा चालू हाये.
नेताजी : हं.
ने०बा० : फौजदारांनी तलावापाशी गंगूबाईला लूप लावलं, म्हणून.
नेताजी : हं.
ने०बा० : रावसायबांस्नी बी लूप लावलं.
नेताजी : हं.
ने०बा० : तरी मी तुम्हांस्नी सांगत व्हते, की ह्या पुलीसवाल्यांशी कधी गट्टी करू नये, म्हणून, येवढी मटन-कोंबडी खाऊ घातली आन् दारू दिली, तरी तुमाला बी लूप लावून गेला म्हनत्यात, सगळे.
नेताजी : ( संतापून ) कोणी सांगितलं, ग, तुला ? वेडपट ! पुरुषाला कधी लूप...च्यायला, अडाणी बाईबरोबर लग्न केलं, ते माझंच चुकलं. मी तुला वॉर्निंग देतो. लास्ट वॉर्निंग, वाचायला, लिहायला, शिकायला सुरुवात कर. नाहीतर तुझ्यासारख्या मूर्ख आणि अडाणी बायकोबरोबर कोण आमदार फ्लॅटमध्ये राहू शकेल ?

ने०बा० : बरं, बरं, लई झालं आता.

नेताजी : ए, वेडे! दोन–चार दिवस जाऊन तू पण करून टाक उपोषण. निवडणुकीत चांगला सपोर्ट मिळेल.

ने०बा० : नकू.

नेताजी : का ?

नेताजी बा० : गावातली कोणी बाई जाती का उपोषणाला ?

नेताजी : अग, महामूर्ख ! इलेक्शनमध्ये तुझ्या नवऱ्याला निवडून यायचं, का गावातल्या बायकांच्या नवऱ्यांना निवडून यायचं ? तू फक्त येडपटासारखी बोल. बाकी काही करू नको.

ने०बा० : नकू.

नेताजी : अग, स्वतः मुख्यमंत्री येऊन संत्र्यांचा रस पाजतील. आहेस कुठं ?

ने०बा० : संत्र्यांचा रसच प्येचा, तर त्येला मुख्यमंत्री कशाला ? घरीबी करून पिता येतू की.

[ नेताजी एकदम संतापाने उठतात. खुंटीवरची टोपी घालतात. आणि कंदील घेऊन बाहेर पडू लागतात. ]

ने०बा० : कुठं चालले रात्रीचे ?

नेताजी : तू बस संत्र्याचा रस काढत !

[ नेताजी जातात. ]

[ कोपऱ्यात गंगूबाई व राम्या बसलेले. ]

राम्या : गंगूबाई, म्हणून म्या साऱ्या गावाची गुरं वळीतो, पण ह्या दोन राक्षसांची गुरं वळत न्हाई.

गंगूबाई : जेवण केलं का, बाबा, तू ? नुसतीच बडबड करत ऱ्हाशील नाहीतर.

राम्या : गंगूबाई, खरं सांगू ? तू उपोषणाला बसल्यापासून अन्नावरची वासनाच उडाली हाये. बग, पोटाचं खळगं भरायचं, म्हून मनाइरुद्ध

ढकलतो कसंबसं, गंगूबाई.

गंगूबाई : अं ?...

राम्या : माझं ऐक आन् सोडून दे हे उपोषण !

गंगूबाई : बरं, बरं. आन् मग तू बसणार हायेस व्हय उपोषणाला ?

राम्या : छ्या ! आपण न्हाई उपोषण करणार, अग, ह्या गावचे हिजडे जर मर्द झाले, तर त्या मुख्यमंत्र्याला बी उपोषणाला बसवू शकतील.

गंगूबाई : बरं, बरं. आता जा, बाबा, तू ! बारा वाजले आसतील.

राम्या : न्हाई, तू झोपली, का जाईल.

गंगूबाई : आरं, तुझी अशी बडबड चालू राहिली, तर कशी येईल, बाबा, मला झोप ? जा, पाहू.

राम्या : बरं, गंगूबाई, चलतू मी.

[ उठून निघून जातो.

नेताजी प्रवेशतात. राम्या जात असलेल्या दिशेकडेते पाठमोरे पाहत असतात. ]

नेताजी : ( गंगूबाईजवळ जातात ) गंगूबाई.

गंगूबाई : कोण ? नेताजी ?

नेताजी : हं. मी खूप प्रयत्न केले, गंगूबाई. पण रावसाब एस्. पी. साहेबांकडे जाऊन आले. आणि त्यांना एक हजार रुपये लाच दिली. एस्. पी. सायबांनी ऑर्डर दिली. रावसाहेबांना अटक होता कामा नये. मग बिचारे फौजदारसाहेब तरी काय करणार ? मी फौजदारसाहेबांना घरी नेऊन ह्याच्यावर उपाय विचारला, ते म्हणाले, की एकच मार्ग आहे. मुख्यमंत्र्यांच्या कानांवर हे सारं प्रकरण घाला. मुख्यमंत्र्यांनी ऑर्डर दिली, की एका मिनिटात फौजदार रावसाहेबांना अटक करेल. मी उद्या सकाळच्याच गाडीनं मुंबईला जाणार आहे, मुख्यमंत्र्यांना भेटायला, गंगूबाई; ह्या कागदावर तू अंगठा दे मी मुख्यमंत्र्यांना येताना बरोबरच घेऊन येतो. ( कागद काढून दाखवतो व देतो. )

गंगूबाई : ( कागद निरखून पाहत. ) नेताजी, हा तर कचेरीचा कागद दिसतूया. त्याच्यावर रुपयाचा छाप दिसतूया.
नेताजी : ( कपाळावरचा घाम पुसत ) मुख्यमंत्र्याजवळ वॉटर मार्कवाली तक्रारच चालते, गंगूबाई. कोर्ट–फी आणि तिकीट नसणाऱ्या तक्रारीला काही पण किंमत नाही मुख्यमंत्र्याकडे.
गंगूबाई : काही लिवलेलं बी दिसत न्हाई त्यावर, कोरा कागद ?
नेताजी : ह्याच्यावर मशीननं टाईप करून घ्यावं लागतं, गंगूबाई. हातानं लिहिलेलं चालत नाही त्याच्यावर.

[ नेताजी खिशातून इंक पॅड काढतात. गंगूबाईचा अंगठा त्या दोन कागदांवर ते उमटवून घेतात. ]

नेताजी : हं. आता कसं सारं व्यवस्थित होईल. गंगूबाई, मुख्यमंत्री येतील आणि तुला स्वतःच्या हातांनी संत्र्याचा रस पाजून उपोषण सोडायला लावतील. ( जातो. )

[ कोंबड्याच्या आरवण्याचा आवाज, रावसाहेब व दोन व्यक्ती गंगूबाई जवळ. ]

गंगूबाई : ( दचकून ) क... कोण हाय ?
रावसाहेब : तुझ्या सावित्रीचा बाप ! छिनाल ! माझी अब्रू घेतीस काय ? उचला, रे, ह्या भडवीला आन् फेकून द्या गटारीमधी !

[ दोघेजण तिला उचलतात. ]

गंगूबाई : ( ओरडत ) मेल्या, तुझा सत्यानाश होवो. तुझ्या वंशाचा दिवा विझून जावो.

[ आवाज दूर जातो, रावसाहेब निघून जातात, जाताना ]

रावसाहेब : तुझा नेताजी येणार न्हाई आता तुला वाचवायला. ए, चला, पळून जा. कोण तरी येऊन राह्यलं.

[ राम्या गंगूबाईला आधार देत घेऊन येतो. ती रावसाहेबाला शिव्या देत राहते. ]

गंगूबाई : राम्या, नेताजी सकाळीच मुंबयुला गेले.
राम्या : समजलं मला.
गंगूबाई : मुख्यमंत्र्यांस्नी भेटाया.
राम्या : त्ये बी समजलं.
गंगूबाई : सावित्री परत येईल... राम्या, आन् रावसायबाला खडी फोडाया जावं लागंल.
राम्या : कोणी बी येणार न्हाई आपल्या मदतीसाठी, गंगूबाई! तू लई भोळी हायेस. अग, नेताजी बी दुतोंडी हाय. फौजदाराचा चमचा हाय...अग, जनावरावाणी त्या दिवशी फौजदार आपल्याशी वागला, तरी बी त्या फौजदाराला नेताजी घरी घेऊन गेला. त्याला दारू पाजली, खाऊपिऊ घातलं.
गंगूबाई : अरे, रावसायबानं मोठ्या सायबाला फितवलं, त्येच विचारायला नेलं होतं नेताजींनी फौजदाराला घरात.
राम्या : गंगूबाई, तू काय बी म्हण. पण माझा न्हाई इस्वास! कोणी बी येणार न्हाई. आपलं दुःख पाह्यला...ना मुख्यमंत्री, ना प्रधान मंत्री, ना भगवान.
गंगूबाई : अन्याय जेवा खूप व्हायला लागतू ना, राम्या, तवा जमीन फाटून जाती.
राम्या : आतापर्यंन तरी मी न्हाई पाह्यली जमीन फाटताना.
गंगूबाई : खरंच फाटंल, राम्या. सीतामाईकरता फाटली, तशी.
राम्या : (एकदम तिरीमिरीत उठत) न्हाई, गंगूबाई, न्हाई! आता वाट न्हाई पाहायची कुणाची बी आपण. आपण सोता अत्याचारीला शिक्षा करू! हां! आपण सोता करायची शिक्षा! ... (जातो.)

[ गावकरी गप्पा मारत आहेत ]

: येत्या विलेक्शनमध्ये नेताजी उभं राहणार हाईत, म्हणे.

: त्ये तर हायेच, पण ते निवडून येतील, पाहा.

: पण माला न्हाई वाटत आसं, आरं, रावसायबासारखा भक्कम माणूस कुणाला ह्या गावामंदी निवडून यीऊन दील, आसं न्हाई वाटत.

: येड लागलं तुला, शंकऱ्या ! आरं, रावसायबाचं डीपाझिट बी जाईल, बग.

: त्ये जाऊ द्या. पोटापाण्याचं बगा. येधशाळेचा अंदाज हाय, की पुढच्या हप्त्यात पाऊस पडंल, म्हनून.

: म्हंजी नक्कीच पाऊस पडणार न्हाई, बग.

: आसं कसं बोल्तू ? शास्त्रशांच म्हणणं हाय.

: आरं, गेली चार वर्सं शास्त्रशांचा अंदाज काय व्हता ? ह्योच होता ना, की पाऊस पडंल, म्हून ?

: त्ये वेडे आन् आपण बी येडे.

: त्यो पाहा आणखी एक येडा यीऊन राह्यला – रामा !

: गुरं मरून राह्यली, म्हणून काम न्हाई ना त्याला, म्हणून काही तरी चरबट करीत बसतू.

राम्या : (प्रवेशून) आज संध्याकाळला सहा वाजता; सहा वाजता संध्याकाळला बिर्डिंगच्या समूर आपल्या पोरीबाळी इकणाऱ्या रावसायबाला आन त्येचा पोरगा राघू हयेला फाशी दिलं जाईल हो ! ... आपण सर्व हिजड्यांस्नी हात जोडून इनंती हाय, की ह्या शुभ परसंगी आपण यावं, हो... !

: ए, ए, ए राम्या, काय झालं वरडायला ? खरंच फाशी देणार हाय ?

राम्या : मग काय खोटं व्हय ? त्यानं पोरी खरंच इकल्या, म्हून खरंच फाशी देणार.

: मग आम्ही यीऊ का ?

राम्या : सगळ्याच हिजड्यांस्नी बोल्विलंय्. तुमी बी त्यांतलेच.

: साल्या, काय बोल्तू ? आम्ही हिजडे ?

: जाऊ दे, रे, शंकऱ्या ! काय, रं, राम्या, तुझे कपडे ?

राम्या : त्या हरामखोरांना घातले ना !

: कोणाला ?

राम्या : रावसायब आन् राघूला !

[ हळूहळू अंधार.

संध्याकाळची वेळ, रावसाहेब व राघू ह्यांच्या प्रतिमा लटकवलेल्या दिसत आहेत. ]

राम्या : गंगूबाई, हा बग, हा रावसायब आन् हा राघू , हा हरामखोर आन ही त्याची औलाद !

गंगूबाई : नेताजी अजून न्हाई आले ?

राम्या : नेताजीचा पुतळा बनवायचा आन् त्येला बी असाच फाशी द्याचा. त्याच्या घरासमोर, जाळून टाकायचा त्याला ! गंगूबाई, ऊठ आन् ही दोरी हातात घिऊन वढ ! फाशी दे ह्या सैतानाला आन् त्याच्या पुतराला.

[ गंगूबाई दोऱ्या हातांत घेते. ]

गंगूबाई : हा रावसायब आन् हा राघू , हा रावसायब आन् हा राघू... !

[ हातातल्या छडीने येणाऱ्या-जाणाऱ्यांना दाखवत, गंगूबाई दोऱ्या ओढते, दोन्ही पुतळे वर उचलले जाऊन जमिनीवर पडतात. ]

राम्या : खलास, मुडदा पडला राक्षसाचा बग ! बग, गंगूबाई, कसा तडफड करतूय हा राघू ! ( जोरजोराने हसत ) मेला, मेला ! सैतान मेला ! सैतानाचा पोरगा बी मेला ! आता ह्या जमिनीवर परत सैतान जल्मणार न्हाई !

[ रावसाहेब त्यांच्या घरात दोन जणांशी बोलत आहेत. ]

रावसाहेब : आन् फेकून द्या मरीआईच्या डोंगरावरून खाली ! काही झालंच, तर सांगून देऊ, गुरं वळता वळता पडला आसंल, म्हणून ! लक्षात ठेवा, काम व्यवस्थित व्हायला हवं.

: आन् गंगूबाई ?

रावसाहेब : तिला आसं न्हाई मारता येणार. त्ये जाऊ द्या. पह्यले ही राम्याची घाण काढा. मग गंगूबाईकडं पाहून घेऊ. जावा, लागा कामाला अं. . . ! हिकडून न्हाई, मागच्या दारानं जावा.

[ दोघेजण येतात. राम्याचे ओरडणे सुरूच असते. दोघेही हळूहळू पुढे जातात. ]

राम्या : हा रावसायब, हा राघू ! हा रावसायब आन् हा राघू !

-

[ ते दोघे आजूबाजूचा अंदाज घेतात. मग एकदम राम्यावर हल्ला करून त्याला उचलतात. गंगूबाई मध्ये पडते. तिला ढकलले जाते. ती कळवळत पडते. ]

गंगूबाई : ( एकदम उठून बिल्डिंगच्या दाराजवळ धावत जात ) सैताना, तुझा सत्यानास होवो ! तुझं सारं खानदान बरबाद होवो ! तुझं घरदार जळून जावो ! तुजा राघू, बघ, रातीतनं खलास होऊन जाईल ! रगताच्या उलट्या होवोत त्येला ! मग भोग दुःख आयुष्यभर ! हा बग... हा बग तुजा राघू ! ( पुतळा उचलून आणते. ) उघड दरवाजा, उघड आन् तयारी कर तुज्या राघूच्या तिरडीची आन् सरणाची. उघड उघड, उघड दरवाजा ! ( दरवाज्याजवळच निश्चेष्ट होऊन कळवळत पडते. )

[ रावसाहेबांचे घर. रावसाहेब अस्वस्थपणे हा प्रसंग पाहत उभे आहेत. त्यांची बायको व मुलगा जवळच आहेत. ]

राघू : ( आईला बिलगत ) आई, ग, भीती वाटून राह्यली, ग. ! ( रडत ) आई, म्या रातीतनं मरून जाईल का, ग ?

रा० बा० : ( त्याच्या तोंडावर हात ठेवत व त्याला मिठीत घेत ) न्हाई, न्हाई, माझ्या राज्या, असं बोलू नकू. असं बोलू नकू, मी मरंल तुझ्या-ऐवजी. ( हुंदके देते. )

[ शांतता पसरलेली. रावसाहेब अधिकच अस्वस्थ झालेले. रावसाहेबची बायको गर्रकन् वळते. ]

रा० बा० : ऐकलं ? ऐका, कान भरून ऐका. आता नाही ऐकवत. रोजचं झालेलं हाय हे. येकच मुलगा हाय आपल्याला. ह्येला त्या डाकिनीनं फासा-वर लटकवलं ( शांतता ) मी...मी इचारते, ह्ये खरं हाये का, की तुमी... ( दोन-तीन वेळा विचारते. त्यांना गदगद हलवत )

रावसाहेब : (तिला झिडकारत) चूप बस जाय ! झोपून घ्ये मुकाट्यानं. नसतं लचांड !

रा० बा० : तुमाला आमची शपथ...आपल्या एकुलत्या एक पोराची शपथ, खरं खरं सांगा. ह्ये समदं खरं हाय का ? बोला...बोला...ना !

[ रावसाहेब येरझारे घालतात. ]

रावसाहेब : तू ...तू ह्ये का न्हाई—इचारत, दोन ट्रॅक्टर घेण्यासाठी पैसे कुठून आले ? ट्यूबवेलसाठी पैसा कसा हुबा राह्यला ?...तू ह्ये का न्हाई इचारत, की तुझ्या बापाला तुझ्या बहिणीच्या लग्नासाठी जे दहा हजार रुपये पाठीवले, ते कुठून आले ?

रा० बा० : ( राघूला कवटाळीत ) हे राम ! ( त्याला उचलून आत नेते )

रावसाहेब : ( स्वतःशीच तळमळत ) काय करावं, काही समजत न्हाई, ऐन विलेक्शनच्या येळी घात झाला. मोठ्या लोकांनी हात मारला आन् आता काखा वर करून मोकळे झाले. सारा विखार म्हून मलाच भोगावा लागतूया ! चव्हाणसाह्येब म्हटले व्हते, की नेताजीलाबी हिस्सा द्या, म्हनू, पण...

[ रा. बा. प्रवेशते. ]

रावसाहेब : ये अशी जवळ, झोपला का राघू ?

रा०बा० : (खांद्यावरचे हात झटकत) हये गाव म्हणजे लंका हाये, ह्या गावाचंबी लंकेवाणी दहन हुईल ! रावण, रावण तुमी हायेत ! आन् नेताजी हाये बिभीषण ! तुमच्या दोघांमुळं ह्या गावाचा सत्यनास हुईल. होऊनच राह्यल सत्यनास, इका...इका सोताच्या आया-बहिणी आन् पोरींना ! मला बी इकून टाका कोणाला तरी. पैसा जमवा. बिल्डिंग बांधा, टॅक्टर ध्या दहा दहा आन् वरूबरच विकून जावा. पन आता मी न्हाई राहणार ह्या घरात, ह्या गावात ! पोराला विकून जाऊन भीक मागंल. पण...

रावसाहेब : आयला, निष्कारण सांगितलं तुला बी. पण आता काय करू ? तुला वरडून गाव गोळा करायचा हाय का ? माजी बदनामी करायची हाय का ? मला जेलमंधी खडी फोडाया पाठवायचं हाय का ?

रा०बा० : बदनामी ! जेलची भीती हाय, तर पोरींना इकलं कशाला ? त्या पोरींना गावात परत आणा !

रावसाहेब : मला बी पश्चात्ताप होऊन राह्यला. मी सगळ्या पोरी गावात परत आणतू. पण गंगूबाई उपोषण सोडेल, तर शांत मनानं मी पोरी आणण्याचा प्रयत्न तरी करू शकेन.

रा०बा० : चला, मग आपण सांगू गंगूबाईला उपोषण सोडाया. आता जाऊ आन् तिचे पाय धरून उपोषण सोडाया सांगू.

रावसाहेब : ठीक हाये. तू जा आन् दूध भरून आण लोट्यामंधी.

[ रा. बा. आतमध्ये जाते, रावसाहेब अगदीच अस्वस्थ झालेले दिसत आहेत. रा. बा. लोट्यात दूध घेऊन येते. ]

रा०बा० : चला.

[ दोघं जिना उतरून येतात. दरवाजा उघडतात. रा. बा. पायरीवर

पडलेल्या गंगूबाईला उठवण्याचा प्रयत्न करते. रावसाहेब बाजूला उभे. ]

रा०बा० : गंगूबाई...गंगूबाई...

गंगूबाई : ऊ...कोण ? नर्मदाबाई ?

रा०बा० : गंगूबाई, आम्हांला माफ कर, गंगूबाई, रावसाहेब उद्या सकाळी जाऊन सावित्री आन् सर्व पोरींना परत आणणार हायेत.

[ ती गंगूबाईला उठवून कोपऱ्यात आणते. ]

रा०बा० : माफ कर, गंगूबाई. तू लै भोगलंस, ह्यांना पश्चात्ताप झालाय् साऱ्या गोष्टींचा. आता उपोषण सोड तू.

रावसाहेब : मला पश्चात्ताप होतोय्, गंगूबाई, केलेल्या पापाचा. मी मी सकाळीच जातू. तू उपोषण सोड.

गंगूबाई : न्हाई, रावसायबं मी न्हाई सोडणार, मुख्यमंत्री आले, तर त्ये काय म्हंतील ?

रावसाहेब : मी सांगीन त्यान्ला सगळं समजावून; पण तू उपोषण सोड, मी लगीच सावित्रीला घिऊन येतो.

रा०बा० : ( पाया पडत ) तुझे पाय धरते, गंगूबाई. आता उपोषण सोड, ह्ये घे दूध पिऊन.

[ रावसाहेब तिच्या हातात लोटा देतात. ]

गंगूबाई : धन्य हो, रावसाहेब, तुमची आन् तुमच्या बायकोची ! तुमाला लई वाईट साईट बोलले.

रावसाहेब : जाऊ दे, गंगूबाई, विसरून जा त्ये.

रा०बा० : घे ह्ये दूध पिऊन ! ( गंगूबाईच्या तोंडाला लोटा लावते. रावसाहेब गंगूबाईचे हात धरतात.) आता जरा इश्रांती घ्ये आन् सकाळी उठून घरी जाय. न्हाई तर चल आमच्याच घरी.

[ रावसाहेब आणि त्यांची बायको माडीवर येतात.
हळूहळू अंधार होऊ लागतो. रातकिड्यांची किरकिर वाढत जाते. थोडासा पक्ष्यांचा चिवचिवाट होतो.
रावसाहेब हळूच दरवाजा उघडून बाहेर येतात. गंगूबाईजवळ जातात. तिचा हात बघतात. आणि डोळे बघायला लागतात, तर गंगूबाई अचेतन होऊन पडते. ]

रावसाहेब : खलास, संपलं सारं! नसतं लचांड! ( माडीकडे पाहत ) आता काही बोलली, तर सालीला दमच भरू, की दूध तर तूच पाजलं होतंस! तूच काही तरी दुधात घातलं असशील. ( खदखदून हसतात. मग गंगूबाईच्या देहाजवळ येत ) गंगूबाई, तुझ्या आत्म्याला सद्‌गती लाभो.

[ जायला निघतात. परत आठवण आल्यासारखं करीत गंगूबाईच्या देहाजवळ येतात आणि पडलेला देह पहिल्याप्रमाणेच बसवायचा प्रयत्न करतात. तेवढ्यात कोंबडा आरवल्याचा आवाज होतो आणि नेताजी प्रवेशतात. ]

नेताजी : काय, रावसाहेब, मेली, का नाही, गंगूबाई अजून ?
रावसाहेब : ( चमकून ) कोण ?
नेताजी : मी, तुमचा शत्रू नंबर एक नेताजी.,

[ रावसाहेबांना काय करावं, ते उमजत नाही. ते अवघडल्यासारखे होतात. ]

नेताजी : घाबरू नका, रावसाहेब! आता युद्ध संपलं आहे. कारण परिस्थितीसह तुमच्याही दोऱ्या माझ्या हातांत अलगद येऊन पडल्या आहेत.
रावसाहेब : म्हंजी ?
नेताजी : समजलं नाही ? सांगतो, गंगूबाईचा खून तुम्ही केला, हे माझ्या-

शिवाय कोणालाही माहीत नाही. तेव्हा...

रावसाहेब : तेव्हा काय ?

नेताजी : च... च... च.. रावसाहेब, अशा वेळी तडजोडीचा हात पुढे करायचा असतो, हे तुमच्यासारख्या राजकारणी माणसाला समजू नये ? ह्यालाच यशस्वी माघार म्हणतात.

रावसाहेब : नेताजी, कबूल आहे, मी हे युद्ध हरलो. तुम्ही जिंकला, सरपंचाच्या निवडणुकीत मी तुमच्याविरुद्ध अर्ज बी भरणार न्हाई.

नेताजी : नाही, रावसाहेब तुम्ही हरला नाहीत, मी आहे तुमच्या पाठीशी आणि सरपंचाच्या निवडणुकीसाठी तुम्हीच उभे राहा. माझा तुम्हांला पाठिंबाच असेल. पण...

रावसाहेब : पण काय ?

नेताजी : रावसाहेब, जिल्ह्याच्या गावी जाऊन मी कालच तुमच्या पक्षात प्रवेश केला आहे. उद्याच्या पेपरात बातमी, फोटो आणि मुलाखत पाहालच तुम्ही.

रावसाहेब : ह्ये लई उत्तम झालं.

नेताजी : उत्तम तर झालंच; पण, रावसाहेब, तुम्हांला अजून समजलं नसेल, परंतु ह्या विधानसभेच्या इलेक्शनमध्ये तिकीट तुम्हांला मिळण्याची शक्यता आहे. आणि...

रावसाहेब : आणि काय ?...

नेताजी : आणि हे तिकीट तुमच्याऐवजी मला मिळालं पाहिजे.

रावसाहेब : पण पक्षश्रेष्टींनी ठरविल्यापरमाणं करावं लागेल. त्यांच्या निकालात मी कसा ढवळाढवळ...

नेताजी : रावसाहेब, राम्या कालपासून बेपत्ता आहे, म्हणतात.

रावसाहेब : असेल. मला न्हाई म्हाईत.

नेताजी : मला पण नव्हतं माहीत, तुमच्याच त्या दोन माणसांनी मला सांगितलं, ज्यांनी त्याला मरीआईच्या डोंगरावरून लोटलं ! ते तुमच्या विरुद्ध कोर्टात साक्षही द्यायला तयार आहेत. पण मी जर... तर तिकीट तुमच्याऐवजी मला मिळण्यासाठी तुम्हांलाच प्रयत्न करावे लागतील. कबूल ?

रावसाहेब : ठीक आहे.

नेताजी : तसंच निवडणुकीचा मला करावा लागणारा वैयक्तिक खर्चही तुम्हीच करायचा.

रावसाहेब : अं ?

नेताजी : आणि निवडून आल्यावर मला मंत्रिपद मिळण्यासासाठी प्रयत्न करायचा.

रावसाहेब : हे कसं शक्य आहे, नेताजी ?

नेताजी : चव्हाणसाहेबांना सांगून काहीही शक्य होऊ शकेल.

रावसाहेब : पण...पण त्यांची न् माझी ओळख नाही.

नेताजी : रावसाहेब, दहा पोरी विकून आलेल्या पैशाचा अर्धा वाटा स्वतःच्या हातांनी तुम्ही ज्यांना दिला, किंबहुना जे तुमचे बॉस आहेत, त्यांना चव्हाणसाहेब म्हणतात. हेही तुम्हांला माहीत नाही ? ( रावसाहेब विस्फारित नजरेने पाहत आहेत. ] मला सगळं माहीत आहे, रावसाहेब ! तडजोड मान्य करा, नाहीतर...

रावसाहेब : मान्य...मान्य आहे मला.

नेताजी : आणि काळजी करू नका. मंत्री झाल्यावर मी तुम्हांला अगदी सुखात ठेवीन. गुड बाय्. आणि हो, रावसाहेब, गंगूबाईचा देह तसाच ठेवू नका.

रावसाहेब : मग ?

नेताजी : जाळून टाका तुम्हीच.

रावसो : मी ?

नेताजी : मग पुरावा काय तसाच ठेवता ? उद्या पोस्टमार्टेम वगैरे झालं, तर तुम्हीच गाळात फसाल. येतो मी. तुमचं तुम्ही काय ते ठरवा. मला तालुक्याच्या गावी जायचंय् ( जातात. )

**अं धा र**

[ गंगूबाईच्या देहाभोवती लोक जमलेले आहेत. ]

: अखेर गंगूबाई उपोषण करतानाच मेली.

: वाईट झालं फार.

: आता आपण डोळे उघडले पाहिजेत. शंकऱ्या! तो राम्या आपल्याला हिजडे म्हणत होता, आपण खरंच हिजडे झालो होतो. आता नाही चूप बसायचं.

: काय बी झालं, तरी चूप नाही बसायचं.

: अन्यायाला इरोध करायचा.

: त्यो नेताजी बी बोगस निघाला.

: गंगूबाईची दोन बिघा जमीन त्येनं स्वतःच्या नावावर करून घेतली.

: ह्ये दोन काळे नाग ठेचायाच हवे.

: गंगूबाईचं काय करायचं ?

: आपण जाळू तिला.

: चला.

[ गंगूबाईचा देह बाहेर नेला जातो. रावसाहेब वाड्याच्या बाहेर येतात. ]

रावसाहेब : वा! ह्ये तर फक्कड काम झालं! पुरावा बी नष्ट झाला आन् पुरावा नष्ट करणारेबी सापडले. येकाच दगडात दोन पक्षी.

अं धा र

[ नेताजींचे घर. ]

ने. बा. : साऱ्या गावामंधी लोक बोलून राह्यले, तुमी गंगूबाईला फसवून तिचे दोन बिघे सोताच्या नावावर करून घेतले, म्हून. ( नेताजी चूप. ) बोला ना.

नेताजी : अग, माझे राणी, मग त्यात फसवणूक कसली आहे ? मी नसतं करून घेतलं, तर रावसाहेबांनी करूनच घेतलं असतं.

ने. बा. : धोकेबाज, बेइमान ! तुम्ही अशी पापं करता, म्हणूनच माझा गर्भ टिकत न्हाई.

नेताजी : हे बघ, निष्कारण माझं डोकं खाऊ नकोस. एकतर धावपळीमुळं मी दमलोय्. आणि पाच-सातशे रुपयाला फटका पण बसलाय्. ( चिडून) हीच का तुझी अक्कल ? मास्तराची बायको व्हायच्याही लायकीची नाहीस तू. तू काय मंत्र्याची बायको होशील ? अग, वेडाबाई, कर्मक्षेत्रावर आणि युद्धक्षेत्रावर सर्व गुन्हे माफ असतात.

ने० बा० : तुम्ही लोक कसाई आहात. सारा गाव म्हंजी एक कसाईवाडा हाये. मी न्हाई -हाणार ह्या गावात.

नेताजी : नको राहू , जा, कुठं जायचं, ते ! पण लक्षात ठेव, जेव्हा हा नेताजी मिनिस्टर होईल, तेव्हा...(आठवण आल्यासारखे खिसे चाचपडतात. डायरी काढतात आणि लिहू लागतात. ) मिनिस्टर झाल्यावर सर्वांत प्रथम गंगूबाईच्या संशयास्पद मृत्यूची चौकशी करण्यासाठी एक चौकशी–आयोग नेमायचा.

अं धा र

[ पहिल्या प्रवेशातला तरुण ऑडियन्स मधून अॅप्रन स्टेजवर येतो. ]

तरुण : संपलं नाटक ? नाही. हे नाटक संपलं नाही. कधीही संपणार नाही. कारण ह्या नाटकाला वारस आहे. आणि ह्या वारसदारांच्या रक्तामध्ये निसर्गानंच पेरून ठेवल्या आहेत अन्याय सहन करण्याच्या पेशी. टू लिव्ह इन धिस लॅंड इज टू ब्रीथ पॉयझनस् एव्हरी डे. विषाचे श्वास घेतले, तरी उच्छ्वासावाटे विष बाहेर पडत नाही. कारण इथे उच्छ्वास गोठले गेले आहेत. त्या उच्छ्वासांच्या खपल्या काढल्या, तरी रक्त बाहेर येत नाही. आणि आलं, तरी ते असतं रंगहीन, चेतनाशून्य, तो एक चाललेला भीषण खेळ, अनादी काळापासून चालत आलेला नंगानाच, वाळवंटाच्या पंज्यात तडफडणारी ओर्से-

सिसं. आभाळात अजूनही ढगांचे काळे हत्ती मुर्दाड होऊन पडलेत...

[ धोंड्याचे पारंपरिक गीत पार्श्वभागी दूरवरून हळूहळू जवळ येते. शेवटच्या संवादाच्या वेळी हे गीत टिपेला पोहोचते. निरनिराळ्या विंगांमधून स्त्री, पुरुष बाहेर पडतात व ऑडियन्समधून निघून जातात. ]

IRBK-0120596

IRBK-0120596